THE OFFICER
Your Personal Mentor

We have been Recognised By...

Stanford | Seed
Stanford Institute for Innovation in Developing Economies

Research Park Foundation

# चालू घडामोडी सप्टेंबर 2024








- इंडस-एक्स (INDUS-X) शिखर परिषद
- शक्तिशाली देशांच्या यादीत भारत तिसऱ्या स्थानी
- ई-गव्हर्नन्सवरील 27 वी राष्ट्रीय परिषद
- विषाणू युध्द अभ्यास
- पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धा 2024

The Officer : Office No.16, Kamla Regency, Dnyanshwar Paduka Chowk, Opp. Bhart Petroleum, FC Road, Pune - 16

9665666195 / 9665288834

THE OFFICER
Your Personal Mentor

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| 1. भारत व जग | 4 |
| 2. राजकीय व घटनात्मक | 10 |
| 3. आर्थिक | 16 |
| 4. नियुक्ती | 19 |
| 5. दिनविशेष | 23 |
| 6. विज्ञान व तंत्रज्ञान | 27 |
| 7. निधन | 31 |
| 8. कृषी व पर्यावरण | 34 |
| 9. सामाजिक व शैक्षणिक | 36 |
| 10. विविधा | 38 |
| 11. क्रीडा | 40 |
| 12. पुरस्कार | 49 |
| 13. संरक्षण व सुरक्षा | 53 |


THE OFFICER
Your Personal Mentor
UPSC / MPSC
We have been Recognised By...
Stanford Seed
BATCH START
6 NOV 2024
वैकल्पिक विषय
समाजशास्त्र
(विषयाचे महाराष्ट्राचे एकमेव तज्ञ मार्गदर्शक)
FREE DEMO LECTURE
6 नोव्हेंबर 2024 रोजी
(सायं. 7:00)
अमोल घोडके सर
13+ YEARS
UPSC/MPSC क्षेत्रातील अध्यापनाचा अनुभव
कोर्सची वैशिष्ट्ये
FLIP मॉडेलवर आधारित अध्यापन व अध्ययन
Main Course - By Covering all Micro Topics Of Syllabus
Assignments - 650+ प्रश्नांचा उत्तर लेखन सराव
1:1 Personal Mentoring
अमर्याद Watch Time
Target Oriented Monthly & Weekly Schedule
अद्यावत आणि परिपुर्ण नोट्स
अधिकारी वर्गाशी संवाद
Regular Evaluation & Critical Feedback By Amol Sir
ACHIEVE SOCIOLOGY EXCELLENCE IN LESS THAN
90 Days!
THE OFFICER
Your Personal Mentor
DOWNLOAD OUR FREE APP
9665666195 / 9665288834
The Officer : Office No.16, Kamla Regency, Dnyanshwar Paduka Chowk, Opp. Bhart Petroleum, FC Road, Pune - 16



# 1. भारत व जग

### नरेंद्र मोदी ब्रुनेई दौऱ्यावर



- पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या ब्रुनेईच्या दौऱ्यावर आहेत.
- या आग्नेय आशियाई देशाला भेट देणारे ते पहिले भारतीय पंतप्रधान आहेत.
- ब्रुनोईचे सुलतान हसनल बोल्कीया यांच्या निमंत्रणावरून मोदी म ब्रुनेईला पोहोचले आहेत.
- ब्रिटनची राणी एलिझाबेथ द्वितीय यांच्यानंतर सर्वांत जास्त काळ राज्य करणारे जगातील ते दुसरे राजे आहेत.

### भारताचा विकासात्मक धोरणाला पाठिंबा



- ब्रुनेई दौऱ्यादरम्यान 'भारत विस्तारवादाच्या नव्हे तर विकासात्मक धोरणाचे समर्थन करतो,' असे प्रतिपादन नरेंद्र मोदी यांनी केले.
- दोन दिवसांच्या ब्रुनेई दौऱ्यावर असलेल्या पंतप्रधान मोदी यांच्या द्विपक्षीय भेटीचा 4 सप्टेंबर रोजी समारोप झाला.
- या वेळी दोन्ही देशांतील जलवाहतूक स्वातंत्र्याच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चारही त्यांनी केला.

- पंतप्रधान मोदींनी सुलतान हसनल बोलकिया यांच्याशी संरक्षण, व्यापार आणि गुंतवणुकीवर व्यापक चर्चा केल्यामुळे भारत आणि ब्रुनेईमधील संबंधांमध्ये वाढ झाली आहे.

**प्रादेशिक, जागतिक मुद्द्यांवर विचारविनिमय**

- दोन्ही देशांतील नेत्यांमध्ये झालेल्या चर्चेत संरक्षण, व्यापार आणि गुंतवणूक, अन्न सुरक्षा, शिक्षण, ऊर्जा, अंतराळ तंत्रज्ञान, आरोग्य, क्षमता निर्माण, संस्कृती आदी विविध विषयांचा समावेश होता.
- आयसीटी, फिनटेक, सायबर सुरक्षा, नवीन आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान आणि अक्षय ऊर्जा यांसारख्या क्षेत्रांमध्ये शोध आणि पाठपुरावा करण्याचे दोन्ही देशांनी या वेळी मान्य केले.
- दोन्ही नेत्यांनी प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवरही विचारविनिमय केला. या वेळी दहशतवादासह इतर कृत्यांचा निषेध करण्यात आला.
- ब्रूनेई भेटीनंतर सिंगापूरला रवाना होण्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या ब्रुनेई भेटीचे वर्णन **'उत्पादक'** म्हणून केले. तसेच भारत आणि ब्रूनेई संबंधांच्या नवीन युगाची सुरुवात करत असल्याचेही ते म्हणाले.

- सिंगापूर दौऱ्यावर असलेले भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सिंगापूरचे पंतप्रधान लॉरेन्स ओंग यांची भेट घेत विविध मुद्द्यांवर चर्चा केली ओम हे पीपल्स ॲक्शन पार्टीचे नेते आहेत.

**चार क्षेत्रांत करार**

- भारत आणि सिंगापूरदरम्यान डिजिटल तंत्रज्ञान, सेमीकंडक्टर, आरोग्य आणि कौशल्य विकास या क्षेत्रांमधील सहकार्यासाठी सामंजस्य करार झाले.
- डिजिटल तंत्रज्ञान क्षेत्रातील कराराद्वारे दोन्ही देश सायबर सुरक्षा, फाइव्ह-जी यांच्यासह सुपर कॉम्प्युटिंग, क्वांटम कॉम्प्युटिंग आणि कृत्रिम बुद्धीमत्ता या अत्याधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रात एकमेकांना सहकार्य करणार आहेत.
- भारतात सेमिकंडक्टर क्लस्टर निर्माण करण्यासाठीही सिंगापूर मदत करणार असून गुंतवणूकही करणार आहे.
- आरोग्य क्षेत्रात संशोधनासाठी दोन्ही देश एकमेकांना मदत करणार असून भारतीय डॉक्टरांना सिंगापूरमध्येही कामाची संधी मिळणार आहे.
- भारतातील कौशल्यविकासासाठीही सिंगापूरची मदत घेतली जाणार आहे.

**भारत - सिंगापूरमध्ये चार क्षेत्रांत करार**



**इंडस-एक्स (INDUS-X) शिखर परिषद**



- तिसरी इंडस-एक्स शिखर परिषद अमेरिकेतील कॅलिफोर्निया येथे संपन्न झाली.
- भारत आणि अमेरिका दरम्यानच्या संयुक्त संरक्षण नवोन्मेषिक परिसंस्थेच्या वाटचालीतील प्रगतीचे ते द्योतक होते.
- 9-10 सप्टेंबर 2024 रोजी अमेरिका-भारत धोरणात्मक भागीदारी मंच (युएसआयएसपीएफ) आणि स्टॅनफोर्ड विद्यापीठाने संयुक्तपणे आयोजित केलेली ही शिखर परिषद म्हणजे एक ऐतिहासिक कार्यक्रम होता.
- भारत-अमेरिका संरक्षण प्रवेग इकोसिस्टम (INDUS-X) परिषदेची **थीम :** "सीमा संरक्षण इनोव्हेशन इकोसिस्टम वाढविण्यासाठी गुंतवणूकीच्या संधींचा उपयोग"
- या शिखर परिषदेदरम्यान, संरक्षण विषयक नावीन्यपूर्ण क्षेत्रात सहकार्य वाढवण्यासाठी आणि उद्योग, संशोधन आणि गुंतवणूक भागीदारी सुलभ करण्यात सहयोग वाढवण्यासाठी आयडेक्स आणि अमेरिकेच्या संरक्षण विभागांतर्गत असलेल्या संरक्षण नवोन्मेष युनिट यांच्यात सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली.
- शिखर परिषदेच्या अन्य प्रमुख वैशिष्ट्यांमध्ये इंडस-एक्स अंतर्गत नवीन आव्हानाची घोषणा, इंडस-एक्स प्रभाव अहवालाचे प्रकाशन आणि आयडेक्स आणि डीआययु संकेतस्थळावर अधिकृत इंडस-एक्स वेबपृष्ठाचे अनावरण यांचा समावेश होता.
- ही शिखर परिषद स्टार्टअप्स/एमएसएमई द्वारे अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या संयुक्त प्रदर्शनासाठी एक मंच प्रदान करते.
- इंडस-एक्स अंतर्गत वरिष्ठ सल्लागार गट आणि वरिष्ठ धुरिण मंच या दोन सल्लागार मंचांद्वारे महत्वपूर्ण विचारमंथन देखील ही परिषद सक्षम करते.
- भविष्यातील तंत्रज्ञानाचा कल, स्टार्टअप्सची क्षमता बांधणी, संरक्षण नवकल्पनांसाठी निधीची संधी आणि संरक्षण पुरवठा साखळी मजबूत करण्यावर परिषदेत चर्चा झाली.
- भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व अमित सतीजा यांनी केले
- अमेरिकेच्या संरक्षण विभागांतर्गत (डिओडी) अंतर्गत संरक्षण मंत्रालय आणि संरक्षण नवोन्मेष युनिट (डीआययु) च्या वतीने इंडस-एक्स उपक्रम इनोव्हेशन्स फॉर डिफेन्स एक्सलन्स (आयडेक्स) अर्थात संरक्षण उत्कृष्टतेसाठी नवोन्मेष द्वारे चालविला जात आहे.
- जून 2023 मध्ये पंतप्रधानांच्या अमेरिका भेटीदरम्यान इंडस-एक्स ची सुरुवात झाल्यापासून, हा उपक्रम अल्पावधीतच महत्त्वपूर्ण टप्पे गाठण्यात यशस्वी झाला आहे.
- **INDUS-X :**भारत आणि यूएस दरम्यान वर्धित धोरणात्मक आणि संरक्षण भागीदारी

आहे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वॉशिंग्टन, डीसीच्या राज्य भेटीदरम्यान यूएस संरक्षण विभाग आणि भारतीय संरक्षण मंत्रालयाने 2023 मध्ये 21 जून रोजी लॉन्च केले होते.

## श्रीलंकेच्या पंतप्रधानपदी हरिणी अमरसूर्या



- श्रीलंकेचे नवे अध्यक्ष अनुरा दिसनायके यांनी देशाच्या पंतप्रधानपदावर हरिणी अमरसूर्या यांची नियुक्ती केली आहे.
- या पदावर नियुक्ती झालेल्या त्या श्रीलंकेच्या तिसऱ्या महिला आहेत.
- याआधी सिरिमाओ भंडारनायके,चंद्रिका कुमारतुंगा,श्रीलंकेच्या महिला पंतप्रधान होत्या.
- अमरसूर्या या नॅशनल पीपल्स पॉवर पक्षाच्या नेत्या आहेत.
- खातेवाटपात त्यांच्याकडे न्याय, शिक्षण, कामगार, उद्योग, आरोग्य आणि गुंतवणूक अशी महत्त्वाची खाती आली आहेत.

### अमरसूर्या यांच्याविषयी

- उजव्या विचारांच्या कार्यकर्त्या
- विद्यापीठात प्राध्यापक
- शैक्षणिक आणि सामाजिक न्याय या क्षेत्रांत कार्यरत
- दिल्लीतील हिंदू कॉलेजमधून पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण
- ऑस्ट्रेलियात उपयोजित मानववंशशास्त्र विषयात पदव्युत्तर शिक्षण
- सामाजिक मानववंशशास्त्र विषयात एडिंबरा विद्यापीठातून पीएच.डी.

## शक्तिशाली देशांच्या यादीत भारत तिसऱ्या स्थानी



- आशियाताल शक्तिशाली देशांच्या निर्देशांकात (एशिया पॉवर इंडेक्स) भारताने जपानला मागे टाकत तिसरे स्थान पटकाविले.
- केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाने ही माहिती दिली.
- भारताच्या वाढत्या विकास दराबाबत ऑस्ट्रेलियन थिंक टँक लोवी इन्स्टिट्यूट या संस्थेने 27 देशांच्या आर्थिक प्रगतीचा आढावा घेताना या क्रमवारीमध्ये भारत ही तिसरी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था असल्याचे जाहीर केले.
- बाह्य आक्रमणासह सर्वप्रकारची संकटे दूर ठेवण्याची एखाद्या देशाची क्षमता कितपत आहे, या निकषाच्या आधारे एशिया पॉवर इंडेक्समध्ये प्रभावी देशांची क्रमवारी ठरविली जाते.

- कोरोनाच्या जागतिक साथीनंतर भारताचा आर्थिक विकास वेगाने झाला. अर्थव्यवस्थेचा विस्तार त्याचप्रमाणे लोकांच्या संख्येत वाढ या कारणांनी भारताची स्थिती मजबूत झाल्याने आशियातील शक्तिशाली देशांच्या निर्देशांकात देशाची कामगिरी सुधारली यामुळे जागतिक व्यासपीठावर भारताची भूमिका आगामी काळात आणखीन महत्त्वाची होऊ शकते.
- गेल्यावर्षी तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या जपानला भारताने मागे टाकले.
- या यादीत अमेरिका सर्वोच्च स्थानी असून चीनचा दुसरा क्रमांक आहे त्यानंतर भारत, जपान, ऑस्ट्रेलिया आणि रशिया अशी क्रमवारी आहे.

## हिंद महासागर रिम संघटनेच्या परिसंवादाचे दुसरे पर्व




- हिंद महासागर रिम संघटनेच्या (Indian Ocean Rim Association - IORA) बेकायदेशीर,नोंद न झालेल्या आणि अनियमित (Illegal, Unreported and Unregulated - IUU)मासेमारी या विषयावरच्या चर्चासत्राचे दुसरे पर्व गोवा येथील नौदल युद्धप्रशिक्षण महाविद्यालयात आयोजित केले गेले होते.
- या चर्चासत्रात हिंद महासागर क्षेत्रातील बेकायदेशीर,नोंद न झालेल्या आणि अनियमित मासेमारीच्या घटना, त्याच्या आर्थिक - पर्यावरणीय आणि सुरक्षा क्षेत्रावरील परिणामांचा आढावा घेतला गेला.
- यासोबतच अशा घटना रोखण्यासाठी हिंद महासागर क्षेत्रातील सदस्य देशांद्वारे अमलात आणता येऊ शकतील अशा प्रकारच्या उपाययोना अशा विविध मुद्यांवरही या चर्चासत्रात विस्तृत चर्चा केली गेली.
- हिंद महासागर क्षेत्राअंतर्गतच्या 17 देशांचे प्रतिनिधी या चर्चासत्रात सहभागी झाले होते.
- यात ऑस्ट्रेलियासह, बांगलादेश, फ्रान्स, इंडोनेशिया, केनिया, मादागास्कर, मोझांबिक, मलेशिया, मालदीव, मॉरिशस, ओमान, सोमालिया, दक्षिण आफ्रिका, सेशेल्स, श्रीलंका, थायलंड आणि टांझानिया या देशांचा समावेश होता.
- सर्व सहभागी देशांच्या प्रतिनिधींनी हिंद महासागर क्षेत्रातील बेकायदेशीर,नोंद न झालेल्या आणि अनियमित मासेमारीच्या घटनांच्या वाढत्या धोक्याचा सामना करण्यासंबंधीच्या चर्चांमध्ये सहभाग घेतला.

## शिगेरू इशिबा जपानच्या पंतप्रधानपदी निवड



- जपानमधील सत्ताधारी लिबरल डेमोक्रॅटिक पक्षाने शिगेरू इशिबा यांची पंतप्रधानपदासाठी निवड केली.
- या आठवड्यात ते जपानच्या पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतील.
- शिगेरू इशिबा संरक्षण धोरणातील तज्ज्ञ असलेले इशिबा जपानचे माजी संरक्षणमंत्री आहेत.
- त्यांनी 'नाटो'च्या धर्तीवर आशियामध्ये लष्करी आघाडीची संकल्पना मांडली आहे.
- तैवानमध्ये लोकशाहीचे ते समर्थक आहेत.
- इशिबा यांनी पंतप्रधानपदाच्या शर्यतीत जपानच्या आर्थिक सुरक्षा मंत्री सानाई तातकाईची यांच्यावर मात केली.
- मावळते ते पंतप्रधान फुमिओ कीशीदा यांना भ्रष्टाचाराच्या प्रकरणामुळे पायउतार व्हावे लागले आहे .

**संरक्षणतज्ञ ते पंतप्रधान**

- संरक्षणतज्ज्ञ असलेले शिगेरू इशिबा या आठवड्यात ते पदाची सूत्रे स्वीकारणार आहेत. 'नाटो'च्या धर्तीवर आशियामध्ये लष्करी आघाडीची संकल्पना त्यांनी मांडली आहे.
- याशिवाय जपान-अमेरिका संरक्षण भागीदारी अधिक समान व्हावी यासाठीही त्यांचा आग्रह आहे.
- तैवानमध्ये लोकशाही व्यवस्था असावी यासाठीचे ते खंदे समर्थक आहेत.
- पंतप्रधानपदाच्या शर्यतीमध्येत 67 वर्षीय इशिबा यांनी जपानच्या आर्थिक सुरक्षा मंत्री सानाई तकाईची यांच्यावर मात केली.
- तकाईची यांना 94, तर इशिबा यांना 215 खासदारांची मते मिळाली.
- इशिबा यांनी जपानचे कृषिमंत्री म्हणूनही यापूर्वी काम पाहिले आहे.

------------



# 2. राजकीय व घटनात्मक

## ई-गव्हर्नन्सवरील 27 वी राष्ट्रीय परिषद




- प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रार विभाग (DARPG) आणि इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने (MeitY), महाराष्ट्र राज्य सरकारच्या सहकार्याने, महाराष्ट्रात मुंबई मध्ये 3- 4 सप्टेंबर 2024 रोजी ई-गव्हर्नन्सवरील 27 वी राष्ट्रीय परिषद (NCeG) आयोजित केली आहे.
- **संकल्पना :** 'विकसित भारत: सुरक्षित आणि शाश्वत ई-सेवा वितरण' ही या परिषदेची संकल्पना आहे.
- महाराष्ट्र सरकारने ई गव्हर्नन्स संदर्भात राबवलेले विविध यशस्वी उपक्रम या परिषदेत प्रदर्शित केले जातील.
- स्मार्ट पीएचसी, सेतूद्वारे डिजिटायझेशन, ब्लॉक चेनद्वारे जात प्रमाणीकरण, पोषण मागोवा, आपत्ती व्यवस्थापन अशा विविध संकल्पनांवर राज्याच्या वतीने सादरीकरण केले जाईल.
- याशिवाय जिल्हास्तरावरील अनेक उपक्रमांवर चर्चा करून यशस्वी उपक्रमांची मोठ्या प्रमाणावर अंमलबजावणी करण्यासाठी अधिक प्रयत्न केले जातील.
- संपूर्ण महाराष्ट्र आणि भारतातील विविध राज्यांतील विविध प्रकल्पांमधून शिकणे हा यामागचा उद्देश आहे.

### ई-गव्हर्नन्सवरील 27 व्या राष्ट्रीय परिषदेविषयी

- या दोन दिवसीय परिषदेचे उद्घाटन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाचे राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार), पृथ्वी विज्ञान मंत्रालय, पंतप्रधान कार्यालयातील राज्यमंत्री, कार्मिक, सार्वजनिक तक्रारी आणि निवृत्तीवेतन मंत्रालय, भारत सरकारचा अणुऊर्जा विभाग आणि अंतराळ विभाग, मंत्री डॉ. जितेंद्र सिंग यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाला महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री, देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार आहेत.
- या परिषदेदरम्यान, 16 उल्लेखनीय उपक्रमांना ई-गव्हर्नन्स 2024 साठी राष्ट्रीय पुरस्कार प्रदान केले जातील.
- या पुरस्कारांमध्ये 9 सुवर्ण, 6 रौप्य आणि एका ज्युरी पुरस्काराचा समावेश आहे.
- हे पुरस्कार केंद्र, राज्य, जिल्हा अधिकारी आणि शैक्षणिक/संशोधन संस्था अशा पाच श्रेणींमध्ये प्रदान केले जाते.
- भारतात सुरक्षित आणि शाश्वत ई सेवा वितरण सुनिशचित करून विकसित भारताच्या दृष्टीकोनात योगदान देण्याच्या उद्देशाने नाविन्यपूर्ण आणि परिवर्तनकारी दृष्टिकोनांवर चर्चा करण्यासाठी सरकारी अधिकारी, उद्योगतज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञांना एकत्र आणणे हा या परिषदेचा उद्देश आहे.

### अपराजिता महिला आणि बाल विधेयक 2024



- पश्चिम बंगालमध्ये नव्या विधेयकानुसार बलात्कार प्रकरणाचा तपास 21 दिवसांतच पूर्ण करणे बंधनकारक असून पीडित मुलगी अत्यवस्थ झाल्यास किंवा तिचा मृत्यू झाल्यास दोषींना दहा दिवसात फाशीची शिक्षा दिली जाणार आहे.
- पश्चिम बंगाल विधिमंडळाचे दोन दिवस विशेष अधिवेशन बोलविण्यात आले आहे .
- यानुसार विधानसभेत मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या उपस्थितीत कायदामंत्री मोलो घातक यांनी मांडलेल्या विधेयकाला अपराजिता महिला आणि बाल विधेयक 2024 (पश्चिम बंगाल गुन्हे कायदा आणि दुरुस्ती) असे नाव दिले आहे.

**विधेयकातील महत्त्वाच्या तरतुदी:**

- पश्चिम बंगालच्या फौजदारी कायदा व दुरुस्ती विधेयकाच्या माध्यमातून बलात्कार व लैंगिक शोषणाच्या घटनांपासून महिला आणि मुलींचे संरक्षण करणे.
- बलात्कारादरम्यान पीडितेचा मृत्यू झाल्यास किंवा अत्यवस्थ झाल्यास अशा स्थितीत दोषीला फाशीची शिक्षेची तरतूद

- 16 पेक्षा कमी वयोगटातील मुलीवर अत्याचार करणाऱ्यास किमान 20 वर्षांची शिक्षा किंवा जन्मठेप आणि दंड
- 12 पेक्षा कमी वयोगटातील मुलीवर अत्याचर करणाऱ्यास किमान 20 वर्षांची शिक्षा, जन्मठेप आणि दंड किंवा मृत्युदंड
- 18 पेक्षा कमी वयोगटातील मुलीवर अत्याचार करणाऱ्यास जन्मठेप, दंड किंवा मृत्युदंड
- सामूहिक बलात्कारातील नराधमांना जन्मठेपेची शिक्षा आणि त्यांना संपूर्ण आयुष्य तुरुंगातच काढावे लागेल. त्यांना पॅरोल रजेची सोय नसेल.
- विधेयकाच्या मसुद्यात भारतीय न्याय संहितेच्या सेक्शन ६४,६६,७०(१), ७१,७२ (१), ७३, १२४ (२) यामध्ये बदलाचा प्रस्ताव आहे. प्रामुख्याने बलात्काऱ्याला शिक्षा, बलात्कार आणि हत्या, सामूहिक बलात्कार, सतत गुन्हे करणे, पीडितेची ओळख सांगणे, ॲसिड हल्ला यासारख्या गुन्ह्यांचा समावेश.
- नव्या विधेयकानुसार, बलात्कार प्रकरणाचा तपास 21 दिवसांत पूर्ण करणे आणि प्रसंगी या तपासाला 15 दिवसांची मुदतवाढ देता येऊ शकेल. परंतु ही मुदतवाढ पोलिस अधीक्षक यांच्या समकक्ष असणारे अधिकारी देऊ शकतील. तत्पूर्वी त्यांना लेखी स्वरूपात याबाबतचे कारण केस डायरीत द्यावे लागेल.
- सराईत गुन्हेगारांना आजन्म शिक्षेची तरतूद केली आहे. यात दोषीला जिवंत असेपर्यंत तुरुंगातच राहावे लागेल. तसेच दंडही आकारला जाईल.
- विधेयकानुसार तपासासाठी विशेष कृती दल तयार करण्याचा प्रस्ताव आहे. त्यास अपराजिता टास्क फोर्स असे नाव असेल. त्याचे नेतृत्व पोलिस अधीक्षक करतील. त्यांच्यावर नव्या तरतुदींनुसार तपासाची जबाबदारी असेल.
- पीडितांना लवकर न्याय मिळण्यासाठी विशेष न्यायालय आणि विशेष तपास पथक नियुक्त करण्याचा प्रस्ताव आहे.
- माध्यमांसाठी नवा नियम केला असून न्यायालयीन कामकाजाचे वार्तांकन प्रसिद्ध करताना परवानगी घ्यावी लागेल. नियमांचे पालन न केल्यास दंडांसह तीन ते पाच वर्षांच्या शिक्षेची तरतूद.

## ‘एक देश, एक निवडणुकीला मंजुरी’



- लोकसभा व राज्यांमधील विधानसभा तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकाच वेळी घेण्याची शिफारस करणाऱ्या रामनाथ कोविंद उच्चाधिकार समितीचा अहवाल केंद्रीय मंत्रिमंडळाने स्वीकारला.
- या अहवालाच्या अंमलबजावणीसाठी देशव्यापी चर्चा केल्यानंतर सहमतीने 'एक

देश, एक निवडणूक' धोरण लागू केले जाईल, अशी माहिती केंद्रीय माहिती व प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकार परिषदेत दिली.

- प्रमुख विरोधी पक्ष काँग्रेसने मात्र या धोरणाला विरोध केला आहे.

**अशी असेल प्रक्रिया**

- पहिल्या टप्प्यात लोकसभा व विधानसभांच्या, तर 100 दिवसांनी दुसऱ्या टप्प्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका.
- धोरण लागू करण्यासाठी केंद्राकडून विशिष्ट तारीख जाहीर केली जाईल. त्या तारखेनंतर सर्व राज्यांच्या विधानसभेच्या निवडणुका घेतल्या जातील.
- पाच वर्षांच्या निवडणूक चक्रामध्ये खंड पडणार नाही याची तरतूद घटनादुरुस्तीद्वारे केली जाईल.
- कोणत्याही कारणाने लोकसभा किंवा विधानसभा भंग करावी लागली तर उर्वरित काळासाठी निवडणूक होईल.
- त्यानंतर ठरलेल्या पाच वर्षांच्या निवडणूक चक्रानुसार लोकसभा व विधानसभेची निवडणूक एकत्रित होईल.

## आतिशी मार्लेना दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्री



- आम आदमी पक्षाच्या नेत्या आतिशी मार्लेना यांनी दिल्लीच्या 8 व्या व 3 ऱ्या महिला मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली.
- राष्ट्रीय राजधानीचे मुख्यमंत्रिपद भूषवणाऱ्या तीन महिला मुख्यमंत्र्यांमध्ये त्या सर्वांत तरुण महिला मुख्यमंत्री ठरल्या आहेत.
- या आधी सुषमा स्वराज आणि शिला दीक्षित यांनी दिल्लीचे मुख्यमंत्रीपद भूषविले होते.
- दिल्लीचे नायब राज्यपाल व्ही. के. सक्सेना यांनी आतिशी व त्यांच्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांना शपथ दिली.
- आतिशी यांचा कार्यकाळ छोटा म्हणजे जेमतेम पाच महिन्यांचाच असेल.
- पुढील वर्षी फेब्रुवारीमध्ये राजधानीत विधानसभा निवडणुका होणार आहेत.

**शैक्षणिक पार्श्वभूमी**

- आम आदमी पक्षाच्या 43 वर्षीय नेत्या आतिशी मार्लेना पंजाबी राजपूत कुटुंबातून आहेत.
- त्यांचा जन्म 8 जून 1981 रोजी दिल्लीत झाला. त्यांचे वडील नामविजय सिंह हे दिल्ली विद्यापीठात प्राध्यापक आहेत.
- आतिशी यांचे शालेय शिक्षण स्प्रिंगडेल स्कूल नवी दिल्ली येथे झाले.
- त्यांनी सेंट स्टीफन कॉलेजमध्ये इतिहासाचा अभ्यास केला आणि ऑक्सफर्ड विद्यापीठातून चेव्हनिंग स्कॉलरशिपवर पदव्युत्तर पदवी मिळवली.

- त्यांनी ऑक्सफर्डमधून शैक्षणिक संशोधनात रोड्स स्कॉलर म्हणून दुसरी पदव्युत्तर पदवी मिळवली.
- त्यांनी मध्य प्रदेशातील एका गावात सात वर्षे सेंद्रिय शेती आणि प्रगतीशील शिक्षण प्रणालींमध्ये अभ्यास केला.
- तिथे अनेक संस्थांसोबत त्यांनी काम केले आणि तिथूनच त्यांचा राजकीय प्रवास सुरू झाला. तिथेच त्या प्रथम काही आप पक्षाच्या सदस्यांना भेटल्या होत्या.

**राजकीय प्रवास**

- 2020 मध्ये आतिशी पहिल्यांदाच कालकाजी विधानसभा मतदारसंघातून आमदार झाल्या.
- त्यांनी भाजपचे उमेदवार धरमवीर सिंह यांचा 11 हजार 393 मतांनी पराभव केला.
- 2023 मध्ये पहिल्यांदा त्यांना केजरीवाल सरकारमध्ये मंत्री पदाची संधी मिळाली.
- अवघ्या एका वर्षानंतर 2024 मध्ये त्या मुख्यमंत्री झाल्या आहेत.
- यापूर्वी त्यांनी 2019 मध्ये पूर्व लोकसभेच्या जागेवरून निवडणूक लढवली होती.
- भाजपचे उमेदवार गौतम गंभीर यांच्याकडून 4.77 लाख मतांनी त्या पराभूत झाल्या होत्या.
- आतिशी या केजरीवाल यांच्या जवळच्या सहकारी आणि विश्वासू मानल्या जातात.
- अण्णा हजारे यांच्या आंदोलनाच्या काळापासून त्या संघटनेत सक्रिय आहेत.
- सध्या त्यांच्याकडे बहुतांश मंत्रालयांची जबाबदारी आहे.
- आतिशी यांनी दिल्लीच्या उपमुख्यमंत्री तसेच मनीष सिसोदियाच्या शिक्षण खात्याच्या त्या सल्लागार म्हणून काम केले आहे.
- त्यांनी मुख्यतः वैकल्पिक शिक्षण आणि अभ्यासक्रमाच्या क्षेत्रात काम केले आहे.

## तामिळनाडूच्या उपमुख्यमंत्रीपदी उदयनिधी स्टॅलिन



- तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांचे पुत्र उदयनिधी स्टॅलिन यांना उपमुख्यमंत्रिपदाची जबाबदारी देण्यात आली आहे.
- याशिवाय तमिळनाडूमध्ये मंत्रिमंडळाचा विस्तार करण्यात आला असून, द्रमुक नेते सेंथिल बालाजी यांच्यासह तीन आमदारांना मंत्रिपदाची शपथ देण्यात आली.
- त्यांच्यासह द्रमुकचे आमदार आर. राजेंद्रन, गोवी चेझिआन आणि एस. एम. नासर यांना तमिळनाडूचे राज्यपाल आर. एन. रवी यांनी रविवारी राजभवनात मंत्रिपदाची शपथ दिली.
- उदयनिधी स्टॅलिन यांच्याकडे युवक कल्याण आणि क्रीडा विकास खाते होते.

- मंत्रिमंडळातील फेरबदलानंतर त्यांना उपमुख्यमंत्री करण्यात आले असून, योजना आणि विकास विभागाची जबाबदारी त्यांना देण्यात आली.

**अभिनेता ते उपमुख्यमंत्री**

- चेन्नईतील लॉयला कॉलेजातून शिक्षण घेतलेले उदयनिधी स्टॅलिन यांनी राजकारणात येण्यापूर्वी अनेक चित्रपटांत अभिनय केला आहे. ते चित्रपट निर्मातेही होते.
- द्रमुकच्या विद्यार्थी शाखेचे नेतृत्वही त्यांनी केले आहे.
- सन 2021 मध्ये राज्यातील विधानसभा निवडणुकीत ते पक्षाचा प्रमुख चेहरा म्हणून समोर आले.
- सन 2022 मध्ये त्यांना मंत्रिपदाची संधी देण्यात आली होती.

## रस्ता सुरक्षेवर जागतिक परिषदेचे आयोजन




- दुखापती प्रतिबंध आणि सुरक्षिततेला प्रोत्साहन देणाऱ्या 'सुरक्षा 2024' या 15 व्या जागतिक परिषदेचे भारतात 2 ते 4 सप्टेंबर दरम्यान आयोजन करण्यात आले आहे.
- रस्ते सुरक्षा वाढविण्यासह बुडण्याच्या घटनांना प्रतिबंध करण्याच्या जागतिक प्रयत्नांवर या परिषदेत भर दिला जाईल.
- ही परिषद आयआयटी दिल्लीद्वारे आयोजित केली जाणार असून 'एम्स', नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेंटल हेल्सचे सहकार्य लाभेल.



# 3. आर्थिक

## नव्या तीन वंदे भारत रेल्वेगाड्यांचे लोकार्पण



- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तीन नव्या वंदे भारत रेल्वेला हिरवा झेंडा दाखविला.
- पंतप्रधान नरेंद्र मोदी हे व्हिडिओ कॉन्फरसिंगच्या माध्यमातून या कार्यक्रमात सहभागी झाले.
- या तीन रेल्वे चेन्नई-नगरकोईल, मदुराई ते बंगळूर आणि मेरठ ते लखनौ अशा धावणार आहेत.

असून तीन कोटींपेक्षा अधिक लोकांनी या रेल्वेतून प्रवास केला आहे.

- वंदे भारत रेल्वेची सुरवात 15 फेब्रुवारी 2019 च्या मेक इन इंडियानुसार केली होती.
- आजघडीला शंभरापेक्षा अधिक वंदे भारत रेल्वे असून या रेल्वेमुळे देशातील 280पेक्षा अधिक जिल्ह्यांना जोडण्यात आले आहे.
- लोकांना वेगवान आणि आरामदायी प्रवासाचा जागतिक दर्जाचा अनुभव प्रदान केला जाणार आहे.
- स्वदेश तंत्रज्ञानाने रेल्वेची निर्मिती केली आहे. यात कवच तंत्रज्ञान, 360 अंशात फिरणारी खुर्ची, दिव्यांगांना अनुकूल स्वच्छतागृहांची सुविधा आणि इंटिग्रेटेड ब्रेल सायनेस बसविले आहे.

## फेडरल बँकेतर्फे पहिली फेशियल पेमेंट सिस्टीम दाखल




- फेडरल बँकेने ग्लोबल फिनटेक फेस्टमध्ये फेशियल पेमेंट सिस्टीम 'स्माईलपे' दाखल केले.
- फेशियल पेमेंट सिस्टम SmilePayलाँच करणारी भारतातील पहिली बँक ठरली
- एक क्रांतिकारी तंत्रज्ञानामुळे ग्राहकांना त्यांच्या चेहऱ्याचा वापर करून व्यवहार पूर्ण करता येतात.
- फेडरल बँकेच्या कार्यकारी संचालक शालिनी वॉरियर यांच्या हस्ते या सुविधेचे उद्घाटन करण्यात आले.
- रिलायन्स रिटेल आणि अनन्या बिर्ला यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र मायक्रो हाऊसिंग कंपनीच्या निवड शाखांमध्ये या नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा प्रायोगिक वापर सुरू करण्यात आला आहे.
- आर्थिक स्वातंत्र्य आणि सोयीसाठी तसेच कार्यक्षम आर्थिक पर्यावरणाकडे जाणारे हे महत्त्वाचे पाऊल आहे.
- या तंत्रज्ञानामुळे ग्राहकांच्या बँकिंग अनुभवात क्रांतिकारी बद्दल होईल.
- ' स्माईल पे' द्वारे ग्राहकांना केवळ चेहरा स्कॅन करून खरेदी पूर्ण करण्याची सुविधा उपलब्ध झाली असून रोख रक्कम कार्ड किंवा मोबाईल शिवाय व्यवहार पूर्ण करता येणार आहेत.

## सर्वाधिक कर भरण्याच्या यादीत शाहरुख खान अव्वलस्थानी



- शाहरुख खान हा देशातील सर्वाधिक कर भरणारा सेलिब्रिटी ठरला आहे.
- त्यांनी 92 कोटी रुपयांचा कर भरला आहे.
- 'फॉर्च्यून इंडिया'ने आर्थिक वर्ष 2023-24 मध्ये सर्वाधिक कर भरणाऱ्या भारतीय सेलिब्रिटींची यादी जाहीर केली.

**सर्वाधिक कर भरणारे पहिले पाच सेलेब्रिटी**

1) शाहरुख खान - 92 कोटी रु.
2) थलपती विजय - 80 कोटी रु
3) सलमान खान - 75 कोटी रु
4) अमिताभ बच्चन - 71 कोटी रु.
5) विराट कोहली - 66 कोटी रु.

**चौथा सर्वांत श्रीमंत अभिनेता**

- सर्वाधिक कमाईसह शाहरुख खान जगातील चौथ्या क्रमांकाचा श्रीमंत अभिनेता बनला आहे.
- कमाईच्या बाबतीत शाहरुखने जॅकी चॅन (₹३३५९ कोटी) आणि टॉम क्रूझ (₹५०३९ कोटी) यांना मागे टाकले आहे.

- करिना कपूर ही देशातील सर्वाधिक कर भरणारी महिला सेलिब्रिटी ठरली आहे.
- अभिनेत्रीने 2023 -24 या आर्थिक वर्षात 20 कोटी रुपयांचा कर भरला.

## 'भास्कर' या डिजिटल प्लॅटफॉर्मचे अनावरण

- देशात स्टार्टअप क्षेत्राला चालना देण्यासाठी केंद्र सरकारने 'भास्कर' (भारत स्टार्टअप नॉलेज ॲक्सेस रजिस्ट्री) हा डिजिटल प्लॅटफॉर्म सुरू केला आहे.
- वाणिज्यमंत्री पीयूष गोयल यांनी 'भास्कर'चे उद्घाटन केले.
- या प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून स्टार्टअप कंपन्यांना परस्परांशी संवाद साधणे आणि परस्परांना सहकार्य करणे सोपे होणार आहे.
- देशभरात आतापर्यंत दीड लाख स्टार्टअप ची नोंदणी झाली असून या क्षेत्रात 15 लाख रोजगारांची निर्मिती देखील झाली आहे.
- त्या पार्श्वभूमीवर स्टार्ट क्षेत्रासाठी एकत्रित माहिती उपलब्ध व्हावी यासाठी ही यंत्रणा उभारण्यात आली आहे .
- वाणिज्य मंत्रालयाच्या अखत्यारीतील औद्योगिक धोरण आणि प्रोत्साहन विभागाच्या वतीने भास्कर प्लॅटफॉर्मची निर्मिती करण्यात आली आहे .
- भास्कर मुळे भारतीय स्टार्ट परिसंस्थेचा प्रभावीपणे तसेच विविध जगासमोर येईल भास्कर डिजिटल प्लॅटफॉर्मवर स्टार्ट क्षेत्रातील उद्योगांना नोंदणीसह संपर्क सहकार्य आणि प्रगतीच्या संधी गुंतवणूकदार उत्पादन सेवा पुरवठादार त्याचप्रमाणे संबंधित सरकारी यंत्रणा अशी सविस्तर माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे.

### असा होईल लाभ

- देशातील कुठल्याही कोपऱ्यातील स्टार्टअप कंपनीला संकल्पना विकसित करण्यापासून ते प्रत्यक्ष साकारेपर्यंत 'भास्कर' मदत करणार
- 'भास्कर'च्या माध्यमातून स्टार्टअप कंपन्यांना विविध टूल्स, स्रोत आणि माहिती उपलब्ध होणार
- स्टार्टअप क्षेत्राला त्यांच्या आर्थिक व्यवहारांचे व्यवस्थापन, सक्षम मनुष्यबळाची भरती करणे यांसाठी मदत होणार
- राष्ट्रीय स्टार्टअप सल्लागार परिषद यासारखी संस्थादेखील या कंपनीसाठी उपयुक्त सल्ला देऊ शकेल.

-----------



# 4. नियुक्ती

## सुरेशकुमार मध्य प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश



- मध्य प्रदेश उच्च न्यायालयाचे नवीन प्रमुख न्यायाधीश म्हणून सुरेश कुमार कैत यांनी शपथ घेतली.
- मध्य प्रदेशचे राज्यपाल मंगुभाई पटेल यांनी राजभवनमध्ये झालेल्या कार्यक्रमात कैत यांना शपथ दिली.
- कैत यांनी यापूर्वी तेलंगण, आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून काम पाहिले आहे.

## मराठी विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ. अविनाश आवलगावकर



- अमरावती जिल्ह्यातील रिद्धपूर येथील मराठी भाषा विद्यापीठाचे पहिले कुलगुरू, कुलसचिवांची निवड करण्यात आली आहे.
- त्यात डॉ. अविनाश आवलगावकर यांची पहिले कुलगुरू म्हणून निवड करण्यात आली.
- एक वर्षाच्या कालावधीसाठी किंवा कुलपतींद्वारे कुलगुरूंची नियमित नियुक्ती

होईपर्यंत जे आधी होईल तोपर्यंत डॉ. आवलगावकर यांची नियुक्ती राहणार आहे.

- उच्च व तंत्रशिक्षण विभागाने या बाबतचा शासन आदेश प्रसिद्ध केला.
- मराठी भाषेचे विद्यापीठ स्थापन करण्याची अनेक वर्षांपासूनची मागणी होती. त्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रिद्धपूर येथे मराठी भाषेचे विद्यापीठ उभारण्याची घोषणा केली होती.
- विद्यापीठाच्या स्थापनेसंदर्भात साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्या अध्यक्षतेखाली सहा सदस्यांची समिती स्थापन करण्यात आली होती.
- या पार्श्वभूमीवर आता पहिले कुलगुरू म्हणून डॉ. अविनाश आवलगावकर यांची निवड करण्यात आली आहे.
- डॉ. आवलगावकर हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे माजी प्रमुख आहेत. त्यांनी अनेक पुस्तकांचे लेखन केले आहे.
- विद्यापीठाचे पहिले कुलसचिव म्हणून उच्च शिक्षण विभागाच्या अमरावती विभागाचे सहसंचालक यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## एअरमार्शल अमर प्रीत सिंग हवाई दलप्रमुख



- एअर मार्शल अमर प्रीत सिंग यांची भारतीय हवाई दलाचे नवीन हवाई दल प्रमुख म्हणून निवड करण्यात आली.
- ते 28 वे हवाईदल प्रमुख असतील.
- एअर मार्शल सिंग यांनी पाच हजारांपेक्षा जास्त काळ उड्डाणांचा अनुभव आहे. सिंग सध्या हवाई दलाचे उपप्रमुख म्हणून कार्यरत आहेत.
- विद्यमान हवाई दलप्रमुख एअर चीफ मार्शल विवेक चौधरी 30 सप्टेंबर रोजी सेवानिवृत्त होणार आहेत.
- 27 ऑक्टोबर 1964 रोजी जन्मलेले एअर मार्शल सिंग यांना डिसेंबर 1984 मध्ये भारतीय हवाई दलाच्या 'फायटर पायलट स्ट्रीम'मध्ये नियुक्त करण्यात आले होते.
- सुमारे 40 वर्षांच्या प्रदीर्घ सेवेत त्यांनी विविध महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे.
- त्यांच्याकडे विविध ई प्रकारच्या विमानांच्या पाच हजारहून अधिक तासांच्या उड्डाणाचा अनुभव आहे. तसेच 'ऑपरेशनल फायटर स्क्वॉड्रन आणि 'फ्रंटलाइन एअर - बेस'चे त्यांनी नेतृत्व केले आहे.
- 'टेस्ट पायलट' म्हणून त्यांनी मॉस्कोमध्ये 'मिग-29' गटाचे नेतृत्व केले होते.
- सिंग हे राष्ट्रीय उड्डाण चाचणी केंद्रात प्रकल्प संचालकही होते.
- त्यांना 'तेजस' या हलक्या लढाऊ - विमानाच्या उड्डाण चाचणीचे काम देण्यात आले होते.

- एअर ऑफिसर हे राष्ट्रीय संरक्षण अकादमी , खडकवासला आणि वायुसेना अकादमी , दुंडीगलचे माजी विद्यार्थी आहेत.
- ते डिफेन्स सर्व्हिसेस स्टाफ कॉलेज , वेलिंग्टन आणि नॅशनल डिफेन्स कॉलेज , नवी दिल्लीचे माजी विद्यार्थी आहेत
- एअर मार्शल सिंग हे स्क्वॅश खेळाडू आहेत.
- त्यांना 2019 मध्ये अति विशिष्ट सेवा पदक आणि 2023 मध्ये परम विशिष्ट सेवा पदकाने सन्मानित करण्यात आले आहे.

**भारतीय हवाई दल**

- **स्थापना : 8 ऑक्टोबर 1932**
- **मुख्यालय : नवी दिल्ली**
- **ब्रीदवाक्य : नभःस्पृशं दीप्तम्**
- **8 ऑक्टोबर : हवाई दल दिन**

## भारतीय हवाई दलाच्या उपप्रमुखपदी तेंजिदर सिंग



- एअर मार्शल तेंजिदर सिंग यांनी भारतीय हवाई दलाच्या उपप्रमुख पदाचा कार्यभार स्वीकारला आहे.
- हवाई दलाच्या वायू भवन या मुख्यालयात हा पदभार स्वीकारल्यानंतर तेजिंदर सिंग यांनी देशासाठी वीरमरण पत्करणाऱ्या जवानांच्या स्मृतिस राष्ट्रीय युद्ध स्मारकात श्रद्धांजली वाहिली.
- राष्ट्रीय संरक्षण अकादमीत प्रशिक्षण घेणारे तेजिंदर 13 जून 1987रोजी हवाई दलाच्या लढाऊ दलात रुजू झाले.
- तेजिंदर हे अ दर्जाचे उड्डाण - प्रशिक्षक असून त्यांना स्वतःला साडेचार हजारांहून अधिक तासांच्या उड्डाणाचा अनुभव आहे
- लढाऊ तुकडीचे नेतृत्व करणे, रडार केंद्राची सूत्रे सांभाळणे इत्यादी अनुभव त्यांच्या गाठीशी असून ते जम्मू कश्मीरमध्ये हवाई दलाचे अधिकारीपदी कार्यरत होते.
- तसेच मेघालयातील शिलॉंग येथे त्यांनी सेवा बजावली आहे.
- या प्रदीर्घ व विविध आघाड्यांवरील सेवेबद्दल 2007 यावर्षी त्यांना वायुसेना पदकाने सन्मानित करण्यात आले होते तसेच 2022 मध्ये राष्ट्रपतींच्या हस्ते अतिविशिष्ट सेवा पदकाने गौरविण्यात आले होते.

## 'एनआरएआय'च्या अध्यक्षपदी कलिकेश सिंह यांची निवड



- भारतीय राष्ट्रीय रायफल (एनआरएआय) संघटनेच्या अध्यक्षपदी कलिकेश नारायण सिंह यांची निवड करण्यात आली आहे.
- संघटनेच्या झालेल्या निवडणुकीत त्यांनी प्रतिस्पर्धी व्ही. के. धवल यांचा 36 - 21 अशा मतांच्या फरकाने पराभव केला.
- रनिंदर सिंग यांनी 2023 मध्ये राजीनामा दिल्यानंतर भारतीय राष्ट्रीय रायफल संघटनेचे अध्यक्षपद रिक्त होते.
- या कालावधीत ओडिशाचे माजी खासदार कलिकेश सिंहच संघटनेचे दैनंदिन कामकाज बघत होते.
- क्रीडा मंत्रालयाच्या आचारसंहितेनुसार राष्ट्रीय क्रीडा महासंघाच्या अध्यक्षपदी एका व्यक्तीस 12 वर्षांपेक्षा अधिक काळ राहता येत नाही.
- रनिंदर सिंग यांचा 12 वर्षांचा कालावधी डिसेंबर 2022 मध्येच संपुष्टात आला होता.
- मात्र, मंत्रालयाने कालावधी संपल्याचे निदर्शनास आणल्यावर रनिंदर मार्चमध्ये पायउतार झाले होते.
- या रिक्त जागेसाठी हे मतदान घेण्यात आले. कलिकेश आता 2025 पर्यंत अध्यक्ष राहतील.

**NRAI : नॅशनल रायफल असोसिएशन ऑफ इंडिया**

- नॅशनल रायफल असोसिएशन ऑफ इंडियाची स्थापना 17 एप्रिल 1951 रोजी भारतात नेमबाजी खेळांना प्रोत्साहन आणि लोकप्रिय करण्यासाठी तसेच स्व-संरक्षण शिकवण्याच्या उद्देशाने करण्यात आली.
- NRAI राष्ट्रीय स्तरावरील नेमबाजी स्पर्धा आणि चाचण्यांचे आयोजन करते जे आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये कोणते खेळाडू देशाचे प्रतिनिधित्व करतील हे ठरवतात.
- लोकसभेचे पहिले सभापती श्री. जी.व्ही. मावळणकर यांनी NRAI ची स्थापना केली आणि तिचे उद्घाटक म्हणून काम केले.
- मुख्यालय: नवी दिल्ली

-----------

# 5. दिनविशेष

## 2 सप्टेंबर : जागतिक नारळ दिन



- आशियाई आणि पॅसिफिक नारळ समुदाय जागतिक नारळ दिन मोठ्या उत्साहात साजरा करतो.
- जागतिक स्तरावर नारळ लागवडीबद्दल लोकांना जागृत करणे आणि नारळ उद्योगाच्या सर्व उपक्रमांना प्रोत्साहन देणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे.
- या उद्देशाने 2 सप्टेंबर 2024 रोजी जगभरात 'जागतिक नारळ दिन' साजरा केला जात आहे.

**जागतिक नारळ दिन - इतिहास**

- आशियाई आणि पॅसिफिक कोकोनट कम्युनिटी (APCC) ने 2009 मध्ये पहिल्यांदा हा दिवस साजरा करण्याचा निर्णय घेतला तेव्हापासून हा दिवस चर्चेत आला आणि तेव्हापासून जगभरात 2 सप्टेंबर रोजी 'जागतिक नारळ दिन' साजरा केला जात आहे.
- 2009 पासून हा दिवस नारळ दिवस म्हणून साजरा करण्याची परंपरा चालू आहे.
- ज्या उद्देशाने, नारळाचे महत्त्व आणि उपयोगिता याविषयी लोकांमध्ये जागरुकता वाढवणे आणि नारळाचे महत्त्व दर्शविण्यासाठी नारळ दिन साजरा केला जातो.
- **थीम : 'चक्रीय** अर्थव्यवस्थेसाठी नारळ, जास्तीत जास्त मूल्यासाठी भागीदारी

निर्माण' (Coconut for a circular economy, Building partnership for maximum value) अशी निश्चित करण्यात आली आहे.

- आरोग्य आणि धार्मिक दृष्टीकोनातून नारळाचा उपयोग पूजेत केला जात असला तरी विविध पदार्थ आणि मिठाई बनवून त्याचा अनेक प्रकारे वापर केला जातो.
- तसेच आरोग्य आणि सौंदर्याच्या दृष्टिकोनातून प्रत्येक घरात नारळ पाणी आणि खोबरेल तेल वापरले जाते.

## 5 सप्टेंबर - राष्ट्रीय शिक्षक दिन



- भारताचे पहिले उपराष्ट्रपती आणि दुसरे राष्ट्रपती असलेले डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन साजरा केला जातो.
- ते एक महान तत्त्वज्ञ आणि विद्वान होते.
- 1954मध्ये त्यांना भारतरत्न हा भारताचा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. आणि 1963 मध्ये त्यांना ब्रिटिश रॉयल ऑर्डर ऑफ मेरिटचे मानद सदस्यत्व देण्यात आले.
- डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म 5 सप्टेंबर 188 रोजी मद्रास प्रेसिडेन्सी येथे झाला.
- एक प्रसिद्ध शिक्षक, डॉ. राधाकृष्णन यांनी कोलकत्ता विद्यापीठ आणि ऑक्सफर्ड विद्यापीठ यांसारख्या प्रतिष्ठित संस्थांमध्ये प्राध्यापक म्हणून काम केले होते.
- ते एक चांगले लेखकसुद्धा होते आणि त्यांनी अमेरिका आणि युरोपमधील व्याख्यानांमधून आंतरसांस्कृतिक समज वाढविण्यास योगदान दिले होते.

### भारतात शिक्षक दिनाची सुरुवात

- राधाकृष्णन यांचा वाढदिवस शिक्षक दिन म्हणून कसा साजरा होऊ लागला. याची कथा त्यांच्या नम्रतेचा आणि शिक्षकी कामाविषयीच्या आदराचा पुरावा आहे.
- डॉ. राधाकृष्णन 1962 मध्ये भारताचे राष्ट्रपती झाले तेव्हा काही विद्यार्थी त्यांना भेटायला आले आणि त्यांनी 5 सप्टेंबर रोजी त्यांचा वाढदिवस साजरा करण्याची विनंती केली. मात्र, विद्यार्थ्यांनी हा दिवस शिक्षकांना समर्पित करावा, अशी सूचना त्यांनी केली.
- अशा प्रकारे 5 सप्टेंबर हा दिवस भारतात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जाऊ लागला.

### शिक्षक दिनाचे महत्त्व

- भारतीय संस्कृती गुरू आणि शिष्य यांच्यातील नातेसंबंधांना खूप महत्त्व देते.
- 5 सप्टेंबर हा शिक्षक दिन केवळ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती साजरी

करत नाही, तर शिक्षकांच्या समर्पण आणि मेहनतीचाही सन्मान करतो.

- विद्यार्थ्यांना आपल्या आवडत्या शिक्षकांविषयी त्यांची कृतज्ञता आणि कौतुक व्यक्त करण्याची संधी मिळते. तर शिक्षकांना आत्मनिरीक्षण करण्याची आणि विद्यार्थ्यांसाठी निरोगी आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण करण्याची संधी मिळते. अशाप्रकारे शिक्षक दिनाला अनन्यसाधारण महत्व आहे

## 16 सप्टेंबर : जागतिक ओझोन दिन




- जागतिक ओझोन दिन 2024 ची थीम:'**मॉन्ट्रियल प्रोटोकॉल: ॲडव्हान्सिंग क्लायमेट ॲक्शन्स**" आहे जी ओझोन थराचे संरक्षण आणि जागतिक स्तरावर व्यापक हवामान कृती उपक्रम चालविण्यामध्ये मॉन्ट्रियल प्रोटोकॉलची महत्त्वपूर्ण भूमिका दर्शवते
- 1995 पासून दरवर्षी 16 सप्टेंबरला संयुक्त राष्ट्र संघटनेच्या (UN) पर्यावरण कार्यक्रम विभागातर्फे "आंतरराष्ट्रीय ओझोन दिन" साजरा केला जातो.
- ओझोन थराच्या संरक्षणासाठी 1887 या वर्षी 16 सप्टेंबर रोजी कॅनडातील मॉन्ट्रिएल शहरात जगभरातील प्रतिनिधींनी एका आंतरराष्ट्रीय करारावर सह्या केल्या.
- ओझोन हा वातावरणामध्ये नैसर्गिकरीत्या आढळणारा एक वायू आहे.
- ओझोनच्या एका रेणूमध्ये ऑक्सिजनचे तीन अणू असल्यामुळे ओझोनचे रासायनिक सूत्र O3 असे लिहितात.
- क्रिस्टियन फ्रेडरिक स्कोएनबेन ह्या जर्मन-स्विस रसायनशास्त्रज्ञाने 1840 साली ओझोनचा शोध लावला.

**महत्त्व**

- जागतिक ओझोन दिनाच्या प्राथमिक उद्दिष्टांपैकी एक म्हणजे जगभरातील लोकांना पृथ्वीवरील जीवसृष्टीचे संरक्षण करण्यासाठी ओझोन थराच्या महत्त्वाच्या भूमिकेबद्दल शिक्षित करणे.
- जागरुकता वाढवून, व्यक्ती आणि समुदाय या महत्त्वाच्या कवचाचे संरक्षण करण्यासाठी कृती अधिक सुसज्ज होतात.

## 20 सप्टेंबर : राष्ट्रीय चित्रपट दिन




- कोरोना कालावधीनंतर लोकांना चित्रपटगृहांकडे आकर्षित करण्यासाठी 2022 मध्ये राष्ट्रीय चित्रपट दिन सुरू करण्यात आला.

- आता त्याची तिसरी आवृत्ती 20 सप्टेंबर रोजी साजरी होत आहे.
- मल्टिप्लेक्स असोसिएशन ऑफ इंडियाने यावर्षी राष्ट्रीय चित्रपट दिनाची तारीख म्हणून 20 सप्टेंबर निश्चित केली आहे.
- या चित्रपटा दिनानिमित्त देशभरातील चित्रपटगृहांमध्ये सिनेमाप्रेमींसाठी केवळ 99रुपयांमध्ये तिकीट उपलब्ध केली जाणार आहे. पीव्हीआर आयनॉक्स, सिनेपोलिस, मिराज, मूव्ही टाइम आणि डिलाइटसह चार हजारांहून अधिक स्क्रीनवर चित्रपट दाखवले जाणार आहेत.
- 2023 या वर्षी 13 ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय चित्रपट दिन साजरा करण्यात आला होता.

## 27 सप्टेंबर : जागतिक पर्यटन दिन




- जगभरातील पर्यटनाचे महत्त्व आणि त्याचा सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक प्रभाव ओळखून दरवर्षी 27 सप्टेंबर रोजी जागतिक पर्यटन दिन साजरा केला जातो.
- भविष्यातील पिढ्यांसाठी अधिक शाश्वत आणि न्याय्य पर्यटन उद्योगाला चालना देण्याचा या दिवसाचा उद्देश आहे.
- या वर्षी, जागतिक पर्यटन दिन, पर्यटन आणि जागतिक शांतता यांच्यातील संबंधावर लक्ष केंद्रित करते, संयुक्त राष्ट्रांनी विविध संस्कृती समजून घेण्याचे आणि शाश्वत पर्यटनाला चालना देण्याचे महत्त्व अधोरेखित केले आहे.
- **जागतिक पर्यटन दिनाची थीम :"पर्यटन आणि शांतता"**

### इतिहास

- जागतिक पर्यटन दिन 1970 मध्ये UNWTO च्या कायद्यांचा अवलंब केल्याच्या स्मरणार्थ साजरा केला जातो.
- आंतरराष्ट्रीय सहकार्याला चालना देण्यासाठी आणि प्रवासी आणि यजमान समुदाय दोघांनाही लाभ देणाऱ्या शाश्वत पद्धतींना चालना देण्यासाठी पर्यटनाच्या भूमिकेवर जोर देण्यासाठी जगभरातील देश परिषदा, प्रदर्शने आणि सामुदायिक क्रियाकलापांमध्ये व्यस्त असतात.
- पर्यटनाच्या फायद्यांबद्दल जागरूकता वाढवण्याच्या उद्देशाने सांस्कृतिक कार्यक्रम, शैक्षणिक उपक्रम आणि कार्यशाळा यासह विविध कार्यक्रमांनी हा दिवस साजरा केला जातो.

-----------




# 6. विज्ञान व तंत्रज्ञान

## 'एआय लॅब'साठी गुगलसोबत करार




- तमिळनाडूत गुंतवणूक आकर्षित करण्याच्या उद्देशाने राज्याचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी अमेरिकेत ॲपल, गुगल आणि मायक्रोसॉफ्ट या तंत्रज्ञान क्षेत्रातील बड्या कंपन्यांच्या कार्यालयांना भेटी देऊन गुंतवणूक; तसेच भागीदारीच्या संधींविषयी चर्चा केली.
- तमिळनाडूमध्ये 'नान मुधलवन' योजनेअंतर्गत 20 लाख तरुणांना कृत्रिम प्रज्ञा अर्थात 'एआय' कौशल्ये प्रदान करण्यासाठी 'एआय लॅब' उभारण्याबाबत गुगलसोबत करार करण्यात आला.
- 'विविध संधी आणि भागीदारी याविषयी चर्चा केली.
- ही भागीदारी मजबूत करण्यासाठी आणि तमिळनाडूला आशियातील आघाडीचे विकास क्षेत्र बनवण्यासाठी कटिबद्ध आहे
- तमिळनाडूमध्ये 'एआय लॅब' स्थापन करण्याबाबत मुख्यमंत्री स्टॅलिन यांच्या उपस्थितीत गुगलसोबत सामंजस्य करार करण्यात आला.

## विषाणू युध्द अभ्यास



- साथरोगांचे नियंत्रण करण्यासाठीच्या सज्जतेचे मूल्यांकन करण्याच्या उद्देशाने राजस्थानच्या अजमेर जिल्ह्यात 27 ऑगस्ट ते 31 ऑगस्ट 2024 या कालावधीत राष्ट्रीय वन हेल्थ अभियानाअंतर्गत

(एनओएचएम) "विषाणू युद्ध अभ्यास" (विषाणूविरुद्धच्या लढ्याचा सराव) हे मॉक ड्रील घेण्यात आले.

- मानवी आरोग्य, पशुपालन तसेच वन्यजीवसंबंधी क्षेत्रातील तज्ञांचा समावेश असलेल्या राष्ट्रीय संयुक्त साथरोग प्रतिसाद पथकाची सज्जता आणि प्रतिसादात्मक कार्य यांचे मूल्यांकन करण्यासाठी ही सराव चाचणी घेण्यात आली.
- यासाठी वास्तव जगातील साथरोगाच्या फैलावाची कल्पना करण्यासाठी पशुजन्य आजाराच्या साथीचा फैलाव झाल्याचे दृश्य उभे करण्यात आले.
- देशात प्रथमच करण्यात आलेल्या अशा प्रकारच्या या सराव चाचणी उपक्रमाचे केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे.पी.नड्डा यांनी कौतुक केले आहे.
- राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्र (एनसीडीसी), भारतीय वैद्यकीय संशोधन मंडळ (आयसीएमआर), आरोग्य सेवा महासंचालनालय (डीजीएचएस), केंद्रीय पशुपालन आणि दुग्धविकास विभाग तसेच सामाजिक आरोग्य केंद्र यांतील डॉक्टर्स आणि कर्मचारीवर्ग या सराव चाचणीमध्ये सहभागी झाला होता.
- ही सराव चाचणी पुढील दोन महत्त्वाच्या घटकांवर आधारित होती :

**अ)** नकली साथीच्या प्रसारासाठी जबाबदार असलेल्या विषाणूच्या अस्तित्वासाठी तपासणी तसेच निश्चित निदान आणि

**ब)** माणसांमध्ये तसेच प्राण्यांमध्ये या आजाराच्या प्रसारावर नियंत्रण ठेवण्यासाठी केलेली कार्यवाही.

- यासंदर्भातील प्रतिसादाचे स्वतंत्र निरीक्षकांकडून निरीक्षण करण्यात आले. एनजेओआरटीच्या निर्देशांनुसार जिल्हा आणि राज्य आरोग्य पथकांनी दिलेला प्रतिसाद बहुतांश वेळा त्वरित आणि सुयोग्य होता असे आढळून आले. या सरावानंतर आणखी सुधारणा आवश्यक असलेली क्षेत्रे देखील निश्चित करण्यात आली.
- विषाणू युध्द अभ्यास हा सराव एक यशस्वी उपक्रम म्हणून सिध्द झाला असून त्याद्वारे पशुजन्य आजारांच्या साथींप्रती भारताची सज्जता तसेच प्रतिसाद यांच्यात सुधारणा करण्याच्या दृष्टीने भविष्यातील धोरणे आखण्यासाठी सर्व संबंधित क्षेत्रांदरम्यान समन्वयीत आणि कार्यक्षम दृष्टीकोन जोपासण्याबाबत मौलिक विचारधन प्राप्त झाले.

## अवकाशात प्रथमच खासगी 'स्पेसवॉक'



- अमेरिकी उद्योजक एलन मस्क यांच्या 'स्पेसएक्स' कंपनीने आता नवीन अंतराळ मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेद्वारे

प्रथमच खासगी स्पेसवॉक केले जाणार आहे.

- 'पोलरिस डॉन मिशन' असे या मोहिमेचे नाव आहे. अंतराळात नेहमीच अंतराळवीर जातात. मात्र. प्रथमच खासगी व्यक्ती अंतराळात जाणार आहे.
- तंत्रज्ञान उद्योजक जेरेड इसाकमॅन यांनी या मोहिमेसाठी अब्जावधी रुपयांची किंमत मोजली असून त्यांच्या स्पेसवॉकची चर्चा सुरू आहे.
- अमेरिकी हवाई दलातील निवृत्त लेफ्टनंट कर्नल किड पोटेट हे वैमानिक आहेत.
- स्पेसएक्स चे हे पोलारिस डॉन मिशन इतर अनेक मार्गांनी देखील महत्त्वाचे आहे. हे संपूर्ण अभियान पाच दिवस चालणार आहे. सर्व प्रवासी स्पेसएक्स च्या शक्तिशाली क्रू ड्रॅगन स्पेसक्राफ्टमध्ये आहेत.
- या मोहिमेचा उद्देश नवीन स्पेससूट डिझाइनची चाचणी करणे हा आहे.

### या चौघांनी उड्डाण केले

- क्रूमध्ये एक अब्जाधीश उद्योजक, एक निवृत्त लष्करी फायटर पायलट आणि दोन स्पेसएक्स कर्मचारी आहेत.
- अब्जाधीश जेरेड इसाकमन, मिशन पायलट स्कॉट पोटेट, स्पेसएक्स कर्मचारी सारा गिलिस आणि अण्णा मेनन यांनी कॅप्सूलमध्ये उड्डाण केले. स्कॉट पोटेट हे अमेरिकन हवाई दलाचे निवृत्त लेफ्टनंट कर्नल आहेत.
- गिलिस आणि अण्णा मेनन हे स्पेसएक्सचे वरिष्ठ अभियंते आहेत.
- इसाकमन आणि गिलिस अंतराळयानातून बाहेर पडतील आणि स्पेसवॉक करतील तर पोटेट आणि मेनन केबिनमध्ये राहतील.
- चार अंतराळवीर तेथे वैज्ञानिक प्रयोगही करतील.
- कॉस्मिक रेडिएशन आणि स्पेस यांचा मानवी शरीरावर काय परिणाम होतो हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

## 'एमएएल' नवीन रक्तगट



- ब्रिटनमधील 'एनएचएस ब्लड अँड ट्रान्सप्लांट' (एनएचएसबीटी) आणि ब्रिस्टॉल विद्यापीठातील संशोधकांना एक नवीन रक्तगट आढळला आहे.
- या रक्तगटाला त्यांनी 'माल' (एमएएल) असे नाव दिले आहे.
- या शोधामुळे सुमारे पन्नास वर्षांपूर्वी 'एएनडब्लूजे' या रक्तगट औटजेनभोवती निर्माण झालेले गूढही उलगडले असल्याचे संशोधकांनी सांगितले.
- या नव्या संशोधनामुळे अनेक जणांचे प्राण वाचविण्यात मदत होईल.
- या प्रयोगासाठी आणि संशोधनासाठी संशोधकांनी वीस वर्षे व्यतीत केली आहेत.

- लुईस टिली यांच्या नेतृत्वाखाली संशोधकांच्या पथकाने हे संशोधन केले आहे.
- 1972 मध्ये 'एएनडब्लूजे' या - रक्तगटाचा अँटिजेन (लाल रक्तपेशींच्या बाहेर असलेले शरीरातील प्रथिने) सापडल्यानंतरही त्याच्या जनुकीय पार्श्वभूमीचा तपास लागत नव्हता. हे शोधण्यासाठी शास्त्रज्ञांनी एक नवीन चाचणी शोधून काढली.
- प्रत्येकाच्या शरीरात असे अँटिजेन असतात, पण कधी कधी त्यांची संख्या कमी असू शकते.
- 'एनएचएसबीटी'ने जनुकीय चाचणीचा आधार घेत रुग्णांमधील हे कमी असलेले अँटिजेन शोधून काढण्याची नवी चाचणी तयार केली.





# 7. निधन

## मधुरा जसराज यांचे निधन



- प्रसिद्ध लेखिका आणि दिग्दर्शिका मधुरा जसराज यांचे वयाच्या 86 व्या वर्षी अंधेरीतील त्यांच्या घरी निधन झाले.
- दिवंगत शास्त्रीय गायक पंडित जसराज यांच्या त्या पत्नी होत.
- दिवंगत प्रसिद्ध दिग्दर्शक व्ही. शांताराम यांच्या मधुरा जसराज या कन्या होत.
- त्या उत्तम लेखिका होत्या.त्यांनी व्ही शांताराम यांच्यावर माहितीपट तयार केला .
- हा माहितीपट त्यांनी स्वतः लिहिला आणि दिग्दर्शित केला .
- संगीत मार्तंड पंडित जसराज आणि 2010 मध्ये 'आई तुझा आशीर्वाद' हा चित्रपट त्यांनी दिग्दर्शित केला होता.

## रोहिदास पाटील यांचे निधन



- खान्देशचे नेते व माजी मंत्री रोहिदास (दाजीसाहेब) चुडामण पाटील यांचे वयाच्या 84 व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले.
- अक्कलपाडा प्रकल्पाचे जनक असलेले रोहिदास पाटील 'दाजीसाहेब' या नावाने खान्देशात परिचित होते.
- महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात दीर्घ काळ मंत्री राहिलेले रोहिदास पाटील मूळचे धुळे शहराजवळील मोहाडी येथील असून, त्यांचा जन्म १३ जून १९४० रोजी रवंदळे कुटुंबात झाला.

- रोहिदास पाटील इंदूर येथील जीएसटीआय महाविद्यालयात बी ई मेकॅनिकलची पदवी संपादन केली.
- शिक्षणानंतर सुरुवातीच्या काळात पाटील बंधू या फर्मखाली मोटरसायकल एजन्सी सुरू केली.
- राजकारणाची बाळकडू घरातूनच मिळाल्याने त्यांनी युवक काँग्रेसच्या चवळीपासून आपल्या राजकीय कारकीर्दला सुरुवात केले .
- अखेरच्या श्वासापर्यंत ते काँग्रेसची एकनिष्ठ राहिले.
- 1972 मध्ये मुकटी गटातून जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणून त्यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीची सुरुवात केली.
- 1978 यावर्षी कुसुंबा विधानसभा मतदारसंघातून विजय मिळवत प्रथमच ते आमदार झाले.
- तेव्हापासून २००९ पर्यंत सलग सात वेळा ते या मतदारसंघात विजयी ठरले.
- माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांचे निकटवर्तीय म्हणून त्यांची ओळख होती.
- एकनिष्ठ, निष्कलंक, धडाकेबाज निर्णय घेणारे मंत्री म्हणून त्यांचा महाराष्ट्राच्या राजकारणात दबदबा होता.
- महसूल राज्यमंत्री म्हणून १२ मार्च १९८६ रोजी त्यांची प्रथमच राज्याच्या मंत्रिमंडळात वर्णी लागली.
- आपल्या राजकीय कारकिर्दीत त्यांनी कृषी व फलोत्पादनमंत्री, कामगार, रोजगार आणि ग्रामविकासमंत्री, पाटबंधारेमंत्री, गृहनिर्माण, पुनर्बाधणी ,संसदीय कार्यमंत्री, कृषी व पशुसंवर्धन अशा विविध खात्यांचा पदभार सांभाळला.
- २२ वर्षे ते महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात होते.
- राज्य सरकारने १९९८-९९मध्ये त्यांचा उत्कृष्ट संसद पट्टू म्हणून गौरव केला होता.
- जिल्हा परिषद सदस्य धुळे बाजार समितीचे सभापती, धुळे खरेदी- विक्री संघाचे चेअरमन, जिल्हा बँकेचे संचालक ,महाराष्ट्र राज्य मार्केटिंग फेडरेशन संचालक, इंडियन फार्मर्स फर्टीलायझर को ऑपरेटिव्ह संस्थेचे संचालक, अशा विविध संस्थांचे त्यांनी यशस्वीपणे कामकाज सांभाळले.

### अभिनेत्री डॅम स्मिथ यांचे निधन



- 'द प्राइम ऑफ मिस जीन ब्रॉडी'साठी ऑस्कर जिंकणारी आणि हॅरी पॉटर चित्रपटांतील प्रोफेसर मिनर्वा रंगवून रसिकांची मने जिंकणारी ज्येष्ठ अभिनेत्री डेम मॅगी स्मिथ यांचे वयाच्या 89 व्या वर्षी लंडनमध्ये निधन झाले.
- ज्युडी डेंच व वेनेसा रेडग्रेव्ह यांच्या चित्रपटयुगातील समकालीन अभिनेत्री

म्हणून पडद्यावर छाप पाडलेल्या स्मिथ यांना आपल्या अभिनयामुळे अनेक ऑस्कर नामांकने मिळाली होती; तसेच असंख्य चित्रपट पुरस्कारांवर त्यांनी आपले नाव कोरले होते.

- 'सडनली लास्ट समर' ही टीव्ही मालिकाही त्यांनी गाजवली.
- एडिनबर्गमधील प्रतिभावंत शिक्षिकेची भूमिका वठवलेल्या स्मिथ यांना या भूमिकेसाठी सन 1969 मध्ये ऑस्कर व 'ब्रिटिश ॲकॅडमी फिल्म ॲवॉर्ड'ने गौरवण्यात आले होते.
- याशिवाय 1978 मध्ये त्यांना कॅलिफोर्निया सूट्स', 'ओथेलो' 'ट्रॅव्हल्स विथ माय आंट' या चित्रपटांसाठी सहायक अभिनेत्रीचे ऑस्कर पुरस्कार; तसेच गोल्ड ग्लोब पुरस्कार मिळाले होते.
- 'रूम विथ ए व्ह्यू'साठी गोल्डन ग्लोब, 1984मध्ये 'ए प्रायव्हेट फंक्शन'साठी बाफ्ता, 1988मध्ये 'द लोनली पॅशन ऑफ जुडिथ हेर्न' साठी बाफ्ता पुरस्काराने गौरवण्यात आले होते.
- 2012मध्ये स्मिथ पुन्हा 'डाउनटाउन ॲबी' या टीव्ही मालिकेतून रसिकांच्या दिवाणखान्यापर्यंत पोहोचल्या.





# 8. कृषी व पर्यावरण

### 'भंडारदरा' जलाशयाला' आद्यक्रांतिकारक भांगरेंचे नाव



- अकोले तालुक्यातील भंडारदरा धरणाच्या जलाशयाला 'आद्यक्रांतिकारक वीर राघोजी भांगरे जलाशय' असे नाव देण्यात आले आहे. यासंबंधीचा निर्णय जलसंपदा विभागाने जारी केला आहे.
- यापूर्वी भंडारदरा धरणाचा जलाशय 'लेक आर्थर हिल' म्हणूनही ओळखला जात असे.
- या भागात आद्यक्रांतिकारक वीर राघोजी भांगरे यांचे कार्य मोठे आहे. त्यामुळे त्यांचे नाव जलाशयाला देण्याची मागणी होत होती.
- त्याला प्रतिसाद देऊन राज्य सरकारने हे नामकरण केले आहे.

### प्रतापगड संरक्षित स्मारक घोषित



- साताऱ्यातील प्रतापगड हा किल्ला राज्य संरक्षित स्मारक म्हणून राज्य शासनाने घोषित केले आहे.
- लवकरच युनेस्कोद्वारा जागतिक वारसा स्थळ 2024 यादीत प्रतापगडचे नामांकन करण्यासाठी त्यांचे पथक गडावर येणार आहे.
- त्या अनुषंगाने प्राचीन व ऐतिहासिक स्मारक संरक्षित स्मारक म्हणून घोषित केल्याने

शासनाच्या अधिसूचनेला महत्त्व प्राप्त झाले आहे.

- गड-किल्ल्यांचा समावेश युनेस्कोच्या नामांकनामध्ये होण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.





# 9. सामाजिक व शैक्षणिक

## बिगर अल्कोहोलिक आजाराशी संबंधित सुधारित उपचार कार्यपद्धतीची मार्गदर्शक तत्वे



केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने यकृतात अतिरिक्त चरबी जमा होण्याच्या बिगर अल्कोहोलिक (Non-Alcoholic Fatty Liver Disease - NAFLD) आजाराशी संबंधित सुधारित उपचार कार्यपद्धतीची मार्गदर्शक तत्वे आणि प्रशिक्षण प्रारुप सप्टेंबर 2024 जारी केले.

नव्या पारुपाच्या या दस्तऐवजांमध्ये यकृतात अतिरिक्त चरबी जमा होण्याच्या बिगर अल्कोहोलिक आजाराने ग्रस्त रुग्णांची सेवा, आणि उपचारानंतरची परिणामकारता सुधारण्यासाठी माहितीपूर्ण, आणि वैज्ञानिक कसोटीवर सिद्ध झालेल्या वस्तुनिष्ठ उपचार - कार्यपद्धतींचा अंतर्भाव केला गेला आहे.

यकृतात अतिरिक्त चरबी जमा होण्याच्या बिगर अल्कोहोलिक आजार झालेल्या रुग्णांना वेळेवर उपचार मिळणे आणि त्यांची योग्य आरोग्यविषक निगा राखणे अत्यंत महत्वाचे आहे. याचीच सुनिश्चिती करण्याच्या उद्देशाने केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने आज जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये, आरोग्यविषयक निगा राखण्यावर आणि आजाराचे सुरुवातीच्या टप्प्यावरच निदान करण्यावर भर दिला गेला आहे.

या दस्तऐवजाच्या माध्यमातून केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने यकृतात अतिरिक्त चरबी जमा होण्याच्या बिगर अल्कोहोलिक आजाराने ग्रस्त व्यक्तीला सर्वंकष रुग्णसेवा देता यावी यादृष्टीने वैद्यकीय क्षेत्राच्या विविध शाखांमधील आरोग्य सेवा प्रदात्यांच्या उपचार प्रक्रियांचे एकात्मिकीकरण करण्यासारख्या बहुआयामी दृष्टिकोनाला पाठबळ देण्याचा प्रयत्न केला आहे.

यकृतात अतिरिक्त चरबी जमा होण्याच्या बिगर अल्कोहोलिक आजाराचे प्रभावी व्यवस्थापन करण्यासाठी, या आजाराविषयी योग्य माहितीचे आकलन असणे गरजेचे आहेच, आणि त्या सोबतच या आजारावर उपचार म्हणून सर्व स्तरालीवर आरोग्यविषयक व्यवस्थांमध्ये वैज्ञानिक कसोटीवर सिद्ध झालेल्या वस्तुनिष्ठ उपचार - कार्यपद्धती अमलात आणण्याची क्षमता घडवणेही तितकेच महत्वाचे आहे.

### तंबाखू निवारण केंद्र



अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था एम्स, नागपूर

येथे तंबाखू निवारण केंद्राचे उद्घाटन 24 सप्टेंबर 2024 रोजी आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय श्री . प्रतापराव जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

तंबाखू मुक्त केंद्राचे व्यवस्थापन मानसोपचार विभागाकडून सामुदायिक औषध विभागाच्या सहकार्याने केले जाईल. राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत तंबाखूमुक्त युवा अभियान 2.0 चा भाग म्हणून हे केंद्र सुरू करण्यात आले आहे.

तंबाखू मुक्त केंद्र संस्थेतील विविध विभागांमध्ये सेवा प्रदान करेल आणि सामुदायिक औषध विभागाच्या सहकार्याने समाजापर्यंत पोहोचेल. यामध्ये औषधोपचार, समुपदेशन सेवा आणि सध्या स्थिती मधील अभिप्राय इत्यादी चा समावेश असेल.





# 10. विविधा

## पुणे विमानतळाला संत तुकाराम महाराजांचे नाव




- लोहगाव येथील विमानतळाला जगद्गुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांचे नाव देण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजूर करण्यात आला .
- राज्य सरकारने मान्यता दिलेला हा प्रस्ताव आता केंद्राकडे जाणार असून तेथे अंतिम मान्यता मिळाल्यानंतर विमानतळाला हे नाव दिले जाणार आहे .
- पुण्यातील लोहगाव येथील आंतरराष्ट्रीय विमानतळाला 'जगद्गुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळ' असे नाव द्यावे असा प्रस्ताव केंद्रीय हवाई नागरी विमान राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी काही दिवसांपूर्वी राज्य सरकारकडे दिला होता.
- लोहगाव हे संत तुकाराम महाराज यांचे आजोळ होते.
- तुकाराम महाराजांचे बालपण देखील येथेच गेल्याने लोहगाव आणि तुकोबा यांचे जिव्हाळ्याचे नाते आहे. त्यामुळे गावकरी, महाराष्ट्रातील तमाम वारकरी सांप्रदायाच्या इच्छेसह विमानतळाला संत तुकाराम महाराज यांचे नाव द्यावे हा प्रस्ताव राज्य सरकारकडे देण्यात आला होता.

## साहित्य संमेलनाच्या बोधचिन्हाचे अनावरण



- दिल्ली येथे होणाऱ्या आगामी 98 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी बोधचिन्ह जाहीर करण्यात आले.
- त्यासाठी घेतलेल्या स्पर्धेतून छत्रपती शिवाजी महाराजांची राजमुद्रा आणि पेनाच्या निबचा समावेश असलेल्या बोधचिन्हाची संमेलनासाठी निवड करण्यात आली आहे.
- संमेलनाचे आयोजक असलेल्या 'सरहद, पुणे' या संस्थेतर्फे बोधचिन्ह निवडण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर स्पर्धा घेण्यात आली होती. यात 100 हून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.
- यातून अंतिम बोधचिन्हाची निवड करण्याची जबाबदारी मनसे पक्षाचे अध्यक्ष व व्यंग्यचित्रकार राज ठाकरे यांच्याकडे सोपविण्यात आली होती.
- त्यांनी लोणी काळभोर येथील 'मंथन स्कूल ऑफ क्रिएटिव्हिटी अँड आर्ट'चे संचालक प्रसाद गवळी यांनी सादर केलेल्या बोधचिन्हाची अंतिम निवड केली.

## 'पोर्ट ब्लेअर' चे नाव आता 'श्री विजयपुरम'



- स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी जिथे काळ्या पाण्याची शिक्षा भोगली त्या अंदमान - निकोबार द्वीपसमुहातील प्रमुख शहर 'पोर्ट ब्लेअर'चे नाव बदलून ते 'श्री विजयपुरम' करण्यात येत असल्याची घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केली.
- देशाला गुलामीच्या सर्व प्रतिकांपासून मुक्त करण्याच्या पंतप्रधान मोदी यांच्या संकल्पाने प्रेरित होऊन गृह मंत्रालयाने 'पोर्ट ब्लेअर'चे नाव बदलून ते 'श्री विजयपुरम' करण्याचा निर्णय घेतला आहे.
- 1789 मध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या आर्चीबाल्ड ब्लेअरच्या सन्मानार्थ पोर्ट ब्लेअरचे नाव देण्यात आले. जे आता 'श्री विजया पुरम'मध्ये बदलले आहे.

-----------




# 11. क्रीडा

## पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धा 2024



- स्पर्धा : 17 वी
- स्पर्धेचा कालावधी : 28 ऑगस्ट ते 8 सप्टेंबर
- क्रीडा प्रकार : 22
- सहभागी देश : 170
- सहभागी खेळाडू : 4,463
- मोटो : गेम्स वाईड ओपन
- उदघाटक : इम्यान्यूएल मॅक्रोन
- पहिली स्पर्धा : 1960, रोम(इटली)

- 7 सुवर्ण , 9 रौप्य, 13 कांस्यपदकासाहित भारत पदकतालिकेत 18 व्या स्थानी
- भारताचे पॅरालिम्पिक समितीचे अध्यक्ष : देवेंद्र झाझरीया
- ओसीए च्या अध्यक्षपदी निवड होणारे रणधीर सिंग पहिलेच भारतीय
- ऑलिंपिक काऊन्सिल ऑफ आशियाच्या (ओसीए) अध्यक्षपदी रणधिर सिंग यांची बिनविरोध निवड झाली आहे.

YOUR PERSONAL MENTOR

## रुबिना फ्रान्सिसला कांस्यपदक



- भारताच्या रुबिना फ्रान्सिसने पॅरालिम्पिक स्पर्धेत नेमबाजीच्या 'एसएच 1'

वर्गीकरणातील महिलांच्या एअर पिस्तूल प्रकारात कांस्यपदकाची कमाई केली.

- पॅरालिम्पिक स्पर्धेत भारताचे नेमबाजीतील हे चौथे पदक ठरले.
- रुबिनाने अंतिम फेरीत 211.1गुणांसह तिसरे स्थान पटकावले.
- रुबिना मध्य प्रदेशातील जबलपूर या ठिकाणची आहे.

## नितेशचे सोनेरी यश



- भारताचा बॅडमिंटनपटू नितेश कुमारने पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत 'एसएल 3' वर्गीकरणातील पुरुष एकेरीत सुवर्णपदकावर मोहोर उमटवली.
- या वर्षीच्या स्पर्धेत सोनेरी यश संपादन करणारा तो नेमबाज अवनी लेखरानंतरचा दुसरा भारतीय खेळाडू ठरला.
- हरियाणाच्या 29 वर्षीय नितेशने संघर्षपूर्ण झालेल्या अंतिम लढतीत ग्रेट ब्रिटनच्या डॅनियल बेथेलचा 21-14, 18-21, 23-21 असा पराभव केला.
- पॅरा स्पर्धेतील 'एसएल3' वर्गीकरणात कमरेखालील अवयव दुर्बल असलेले स्पर्धक भाग घेतात. या प्रकारात अर्ध्या रुंदीच्या कोर्टवर खेळावे लागते.
- वयाच्या 15 व्या वर्षी विशाखापट्टणम येथे झालेल्या रेल्वे अपघातात नितेशने आपला डावा पाय गमावला होता.

## तुलसी, सुहासला रौप्य



- भारताच्या तुलसीमती मुरुगेशन आणि सुहास यशिराज या पॅरा-बॅडमिंटनपटूंनी रौप्य पदक पटकावले
- 'एसयू 5' वर्गीकरणातील महिला एकेरीत मनीषा रामदासने डेन्मार्कच्या कॅथरिन रोसेनग्रेनचा 21-12, 21-8 असा पराभव करून कांस्यपदक आपल्या नावे केले.

## सुमित अंतिलची विक्रमासह सुवर्ण कमाई



- भारताचा तारांकित भालाफेकपटू सुमित अंतिलने सलग दुसऱ्या पॅरालिम्पिक स्पर्धेत सुवर्णपदक जिंकण्याची कामगिरी केली.
- सलग दुसऱ्या पॅरालिम्पिक स्पर्धेमध्ये सुवर्ण पदक मिळवणारा सुमित हा भारताचा दुसरा तर पहिलाच पुरुष खेळाडू ठरला.

- यापूर्वी नेमबाज अवनी लेखराने अशी कामगिरी केली आहे.
- सुमितने अंतिम फेरीत वर्चस्व गाजवले सुमितने 70.59 मीटर भाला फेकत विक्रम आपल्या नावे लिहिला.
- याआधी टोकियो स्पर्धेत 68.55 मीटरचा भालाफेकीत त्याने विक्रम रचला होता. स्वतःचाच विक्रम त्याने मोडीत काढला

## उंच उडीत निशादला रौप्य पदक




- हिमाचल प्रदेशातील उना येथील उंच उडीपटू निषाद कुमारने भारताला ॲथलेटिक्स मधील तिसरे पदक मिळवून दिले.
- 24 वर्षीय निशादने 2.06 मीटर उडीसह रौप्य पदक पटकावले .
- विशेष म्हणजे टोकियो येथे झालेल्या स्पर्धेतही त्याने रौप्य पदक मिळवले होते.

## थाळीफेकीत योगेश कथुनियाचे रौप्य पदक



- पुरुषांच्या एफ 56 वर्गीकरणातील थाळीफेक प्रकारात भारताच्या योगेश कथुनियाने रौप्य पदक पटकावले .
- त्यांनी 42.22 मीटर फेक करताना हंगामातील सर्वोत्तम कामगिरी नोंदवली.
- योगेशने टोकियो स्पर्धेतही रौप्य पदक पटकावले होते.

## शीतल- राकेशला कांस्य



- एकेरीत पदकाने हुलकावणी दिल्यानंतर पायाने लक्ष्यभेद करणाऱ्या शीतल देवीने राकेश कुमारच्या साथीने खेळताना पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये तिरंदाजीच्या कम्पाऊंड प्रकारातील मिश्र सांघिक गटात कांस्यपदकाची कमाई केली.
- संघर्षपूर्ण लढतीत शीतल-राकेश जोडीने इटलीच्या एलोनोरा सार्टी- मॅट्टओ बोनासिना जोडीचा १५६-१५५ असा अवघ्या एका गुणाच्या फरकाने पराभव केला. पॅरालिम्पिकमधील तिरंदाजीत भारताला मिळालेले हे दुसरेच पदक आहे.
- यापूर्वी टोकियो स्पर्धेत हरविंदर सिंगने वैयक्तिक कांस्यपदक मिळवले होते.

## दीप्तीला कांस्यपदक




- भारताच्या दीप्ती जीवानजी ने पॅरिस पॅरालिंपिकमधील महिलांच्या ४०० मीटर शर्यतीत (टी- २०) कांस्य पदकावर नाव कोरले.
- तिने ५५.८२ सेकंदात ही शर्यत पूर्ण करत भारतासाठी १६वे पदक पटकावले.
- दीप्ती हिचे पॅरालिंपिकमधील हे पहिलेच पदक ठरले.
- याआधी तिने जागतिक व आशियाई पॅरा स्पर्धेत पदक पटकावले होते.
- भारताचे या वर्षाच्या पॅरालिंपिकमधील ॲथलेटिक्सतील हे सहावे पदक ठरले

## हरविंदरला तिरंदाजीत सुवर्ण




- भारतीय तिरंदाज हरविंदर सिंगने पॅरालिम्पिक स्पर्धेत सुवर्णपदकाची कमाई केली.
- रिकर्व्ह प्रकाराच्या अंतिम फेरीत हरविंदरने पोलंडच्या लुकास सिझेकचा एकतर्फी लढतीत सलग तीन सेट जिंकताना 6-0(28-24, 28-27, 29-25) असा पराभव केला.
- तिरंदाजीत सुवर्णपदक मिळविणारा हरविंदर भारताचा पहिला तिरंदाज ठरला.
- हरविंदरने टोक्यो पॅरालिम्पिक स्पर्धेत कांस्यपदक पटकावले होते.
- पॅरिस स्पर्धेत भारताचे हे चौथे सुवर्ण आणि एकूण 22 वे पदक ठरले.

## महाराष्ट्राच्या सचिन खिलारीचे रौप्यपदक



- महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातून आलेल्या सचिन खिलारीने पॅरालिम्पिक स्पर्धेत 'एफ 46' वर्गीकरणातील पुरुषांच्या गोळाफेक प्रकारात रौप्यपदक पटकावले.
- सचिनने 16.32 मीटर गोळाफेक करताना आशियाई विक्रमाचीही नोंद केली.
- याच वर्षी मे महिन्यात जपानमध्ये झालेल्या जागतिक पॅरा ॲथलेटिक्स स्पर्धेत 34 वर्षीय सचिनने सुवर्णपदक मिळवताना 16.30 मीटरचा आशियाई विक्रम प्रस्थापित केला होता.

## शरदचे रूपेरी यश

- भारताच्या शरदकुमारने पॅरालिम्पिकमधील पॅरा ॲथलेटिक्समधील उंच उडीच्या टी-63 गटात रौप्यपदक मिळवले.

- याच प्रकारात मरियप्पन थांगावेलू याने कांस्यपदक जिंकले.

**अजितसिंगला रौप्य पदक**

- भारताच्या अजितसिंगने पुरुषांच्या भालाफेकीतील एफ-46प्रकारात रौप्यपदक जिंकले, तर सुंदरसिंग गुर्जर याने कांस्यपदकाची कमाई केली.

## धरमबीरला आशियाई विक्रमासह सुवर्णपदक



- भारतीय खेळाडूंनी पॅरिस पॅरालिंपिकमधील क्लब थ्रो या क्रीडा प्रकारात सुवर्ण व रौप्यपदकांची कमाई केली.
- धरमबीर याने आशियाई विक्रमासह सुवर्णपदकाला गवसणी घातली, तर प्रणव सुरमा याने रौप्यपदकावर मोहोर उमटवली.
- क्लब थ्रो या खेळात भारताला पहिल्यांदाच पदक पटकावता आले.
- क्लब थ्रो (एफ 51) या प्रकारात जगभरातील 10 खेळाडू अंतिम फेरीत पोहोचले होते.
- धरमबीर याचे पहिले चार प्रयत्न अपयशी ठरले. त्याने पाचव्या प्रयत्नात 34.92मीटर दूर लाकडी दांडू (क्लब) फेकला.
- हा थ्रो त्याच्यासाठी महत्त्वपूर्ण ठरला कारण याच थ्रोने त्याला सुवर्णपदक मिळवून दिले.
- भारताच्या प्रणव सुरमा याने पहिल्याच प्रयत्नात 34.59 मीटर दूर लाकडी दांडू टाकत रौप्यपदक पटकावले.

**क्लब थ्रो खेळ प्रकार**

- भालाफेक, गोळाफेक, थाळीफेक याचप्रमाणे क्लब थ्रो हा खेळ खेळला जातो.
- या खेळामध्ये सहभागी होणारे खेळाडू लाकडी दांडू (साधारण मुदगलच्या आकाराचा) हातामध्ये घेऊन तो फेकून देतात.
- त्यानंतर तो दांडू कुठपर्यंत पोहोचला याचे अंतर मोजले जाते.
- लाकडी दांडू सर्वाधिक दूर फेकणाऱ्या खेळाडूंना पदकांवर मोहोर उमटवता येते.

## अमेरिकन ओपन : 2024 - महिला एकेरीत सबालेंका विजेती



- बेलारूसच्या अरिना सबालेन्काने अमेरिकेच्या जेसिका पेगुलाला सरळ सेटमध्ये पराभूत करत अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेच्या महिला एकेरीचे जेतेपद मिळवले.

- दुसऱ्या मानांकित सबालेन्काने अंतिम सामन्यात सहाव्या मानांकित पेगुलावर 7-5, 7-5 असा विजय मिळवला.
- सबालेन्काचे हे पहिलेच अमेरिकन टेनिस स्पर्धेचे जेतेपद आहे. तर, कारकीर्दीतील एकूण तिसरे विजेतेपद आहे.तसेच या वर्षातील दुसरे ग्रँड स्लॅम विजेतेपद ठरले.

**सबालेंकाचे विजेतेपद**

1) 2023 - ऑस्ट्रेलियन ओपन
2) 2024 - ऑस्ट्रेलियन ओपन
3) 2024 - अमेरिकन ओपन

**पुरुष एकेरीत सिन्नर विजेता**



- जागतिक क्रमवारीत अग्रस्थानी असणाऱ्या इटलीच्या यानिक सिन्नरने अमेरिकेच्या टेलर फ्रिट्झला सरळ सेटमध्ये पराभूत करत अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेतील पुरुष एकेरीचे जेतेपद पटकावले.
- सिन्नेरने अंतिम सामन्यात फ्रिट्झवर 6-3, 6-4, 7-5 असा सरळ सेटमध्ये विजय मिळवला.
- इटलीच्या यानिक सिन्नरने प्रथमच अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेचे विजेतेपद पटकावले आहे.
- सिन्नरच्या कारकिर्दीतील हे दुसरे ग्रँड स्लॅम विजेते ठरले आहेत.
- यापूर्वी त्याने या वर्षाच्या सुरुवातीला ऑस्ट्रेलियन टेनिस स्पर्धेचे अजिंक्यपद मिळवले होते.
- यानिक सिनर व अरीना सबलेंका या दोन खेळाडूंनी यावर्षी ऑस्ट्रेलियन व अमेरिकन या दोन हार्ड कोर्टवरील ग्रँडस्लॅम स्पर्धा जिंकण्याचा पराक्रम केला.
- टेनिस कारकिर्दीतील पहिले दोन ग्रँडस्लॅम विजेतेपद एकाच वर्षी पटकावणारा यानिक सिन्नर हा जिमी कॉर्नर्स (1974) व गिर्लेमो विलास (1977) यांच्यानंतरचा तिसराच पुरुष टेनिसपटू ठरला आहे.
- यानिक सिन्नर हा अमेरिकन ओपन टेनिस स्पर्धेत एकेरीचे विजेतेपद पटकाविणारा इटलीचा दुसरा खेळाडू ठरला.
- याआधी 2015 मध्ये फ्लाविया पेनेट्टाने महिला एकेरीचे विजेतेपद पटकावले होते.
- खुल्या युगात (1968 नंतर) ही स्पर्धा पुरुष एकेरीमध्ये रॉजर फेडरर, पीट सॅम्प्रास व जिमी कॉनर्स ह्या टेनिसपटूंनी सर्वाधिक वेळा (प्रत्येकी 5 वेळा) तर महिला एकेरीमध्ये ख्रिस एव्हर्टने 6 वेळा जिंकण्याचा विक्रम केला आहे.

**अमेरिकन ओपन - 2024**

- स्पर्धा - 144 वी

- सुरवात - 1881
- कोर्ट - हार्ड कोर्ट

## भारताचे ऐतिहासिक विजेतेपद




- हुलुनबुर, चीन येथे झालेल्या आशियाई अजिंक्यपद हॉकी स्पर्धेत भारताच्या पुरुष संघाने अंतिम फेरीत चीनचा 1 - 0 असा पराभव करून जेतेपद पटकाविले.
- या विजेतेपदासह भारताने इतिहास घडवीत पाचव्यांदा (सर्वाधिक वेळा)आशियाई चॅम्पियन्स चषकावर आपले नाव कोरले.
- भारताने या स्पर्धेच्या इतिहासात सहाव्यांदा अंतिम फेरीत प्रवेश मिळवला होता.
- भारताच्या जुगराज सिंगने सामना संपण्यास 9 मिनिटे असताना सामन्यातील एकमेव गोल केला.
- कर्णधार हरमनप्रीतने स्पर्धेत सात गोल केले. हरमनप्रीतला यावेळी प्लेअर ऑफ दि टूर्नामेंटचा किताब मिळाला.

### भारताला सलग दुसऱ्यांदा विजेतेपद

- चीनचा पराभव करून भारताने विक्रमी पाचव्यांदा आणि सलग दुसऱ्यांदा आशियाई विजेतेपद पटकावले.
- भारतीय संघाने स्पर्धेत चमकदार कामगिरी केली आणि 25 गोल केले आणि केवळ पाच गोल स्वीकारले.
- आशियाई हॉकी स्पर्धेला 2011 मध्ये सुरवात झाली. पहिल्या आशियाई हॉकी स्पर्धेचे विजेतेपदही भारतानेच पटकावले होते.

### आशियाई स्पर्धेचे विजेतेपद मिळवणारे देश

- भारत (5 वेळा) : 2011, 2016, 2018, 2023, 2024
- पाकिस्तान (3 वेळा) : 2012, 2013, 2018
- दक्षिण कोरीया (1 वेळा) : 2021

## बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये भारताला सुवर्णयश



- भारताच्या पुरुष आणि महिला बुद्धिबळ संघांनी इतिहास रचला.
- दोन्ही संघांनी अफलातून कामगिरी करून 45 व्या बुद्धिबळ ऑलिम्पियाड स्पर्धेत सुवर्णपदक मिळवले.

- भारताच्या पुरुष आणि महिला संघाने प्रथमच बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये सुवर्णयश मिळवले.
- अंतिम फेरीत भारताच्या पुरुष संघाने स्लोव्हेनियावर, तर महिला संघाने अझरबैजान संघावर मात केली.
- भारताच्या पुरुष संघाने यापूर्वी 2014 आणि 2022च्या स्पर्धेत कांस्यपदक जिंकले होते.
- भारताच्या महिला संघाने चेन्नईत झालेल्या 2022मधील स्पर्धेत कांस्यपदक मिळवले होते.
- करोना काळात 2020 आणि 2021मधील स्पर्धा ऑनलाइन पद्धतीने झाली होती. यात पुरुष आणि महिला संघ एकत्रित करण्यात आले होते.त्यात 2022मधील स्पर्धेत भारतीय संघ रशियासह संयुक्त विजेता ठरला होता.
- बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये एकाच वेळी दोन्ही स्पर्धा जिंकणारा भारत हा केवळ सातवा संघ ठरला आहे.
- एकाच ऑलिम्पियाडमध्ये दोन्ही सांघिक स्पर्धा जिंकण्याचा प्रसंग 2018 नंतर प्रथमच घडला.
- 2018 मध्ये चीनने हे यश मिळवले होते.
- **भारताचा पुरुष संघ:** आर. प्रज्ञानंद , पी. हरिकृष्णा, डी. गुकेश, विदित गुजराती, अर्जुन एरिगेसी
- **महिला संघ:** आर. वैशाली, तानिया सचदेव, डी. हरिका, वंतिका अगरवाल, दिव्या देशमुख

## 37व्या अखिल भारतीय टपाल बुद्धिबळ स्पर्धा-2024



- महाराष्ट्र आणि गोवा परिमंडळ टपाल क्रीडा मंडळ 37 व्या अखिल भारतीय टपाल बुद्धिबळ स्पर्धा-2024 चे यजमानपद भूषवत आहे.
- गोव्यात पणजी इथे मेनेझेस ब्रगॅन्झा संस्थेच्या सभागृहात ही स्पर्धा होत आहे.
- 23 सप्टेंबर रोजी मुख्य अतिथी म्हणून गोव्याचे मत्स्योद्योग मंत्री नीळकंठ हळरणकर यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. ही स्पर्धा 27सप्टेंबरपर्यंत चालणार आहे.
- या स्पर्धेनिमित्त 37 वी अखिल भारतीय टपाल बुद्धिबळ स्पर्धा-2024 विशेष टपाल पाकिटाचे प्रकाशन करण्यात आले. पहिले पाकीट अमिताभ सिंह यांच्या हस्ते मंत्री हळरणकर यांना देण्यात आले.
- देशातील 20 टपाल परिमंडळातील एकूण 121 खेळाडू या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत उतरले आहेत.
- सहभागी परिमंडळांमध्ये आंध्र प्रदेश, बिहार, छत्तीसगढ, दिल्ली, गुजरात, हरयाणा, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि कश्मीर, झारखंड, कर्नाटक, मध्य प्रदेश,

महाराष्ट्र, ईशान्य, ओदिशा, पंजाब, राजस्थान, तमिळनाडू, तेलंगण, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगालचा समावेश आहे.

- स्पर्धेसाठी मुख्य पंच अरविंद म्हामळ हे जोत्स्ना सारीपल्ली, आशा शिरोडकर आणि सुधाकर परगार या उपपंचासह परीक्षण करत आहेत.
- नवी दिल्लीतील टपाल महासंचालनालयाचे सहाय्यक महासंचालक (प्रशासन) विनायक मिश्रा यांची मुख्य निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
- लोकेश कुमार मीना यांना तांत्रिक प्रतिनिधी म्हणून नेमण्यात आले आहे.
- गोवा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष महेश कांदोळकर उद्घाटन सोहळ्याला मानद अतिथी म्हणून उपस्थित होते.






# 12. पुरस्कार

### रॅमन मॅगसेसे पुरस्कार




YOUR PERSONAL MENTOR

- व्हिएतनामच्या डॉक्टर गुयेन थी न्गोक फुओंग, इंडोनेशियाच्या फरविजा फरहान, जपानमधील लोकप्रिय ॲनिमेटर मियाझाकी हायाओ, थायलंडस्थित 'द रुरल डॉक्टर्स मूव्हमेंट' हा डॉक्टरांचा गट, भूतानमधील कर्मा फुंतशो यांना या वर्षाचा 'रॅमन मॅगसेसे' पुरस्कार जाहीर झाला आहे.
- त्यांना मनिला येथील मेट्रोपॉलिटन थिएटरमध्ये पुरस्कार आणि रोख पारितोषिक प्रदान करण्यात येणार आहे.
- 'समोर असलेल्या अनेक आव्हानांना तोंड देऊन त्यांचा धैर्याने सामना करणाऱ्या व्यक्तींची निवड या पुरस्कारासाठी करण्यात आली आहे.
- अमेरिका-व्हिएतनाम युद्धादरम्यान अमेरिकी सैन्याने 'एजंट ऑरेंज' नावाचे विषारी रसायन पिके नष्ट करण्यासाठी वापरले होते.
- त्याच्या विनाशकारी आणि दीर्घकालीन परिणामांवर फुओंग यांनी विस्तृत संशोधन केले आहे.
- थायलंडच्या ग्रामीण गरिबांना पुरेशी आरोग्यसेवा मिळवून देण्यासाठी तेथील डॉक्टर प्रयत्नशील असल्याने त्यांची निवड करण्यात आली.

- इंडोनेशियाच्या फरहान यांनी पर्यावरण रक्षणासाठी उल्लेखनीय कार्य केल्याने या पुरस्कारासाठी त्यांची निवड झाली.
- जपानी ॲनिमेटर हायाओ यांनी लहान मुलांसमोरील गुंतागुंतीचे प्रश्न हाताळले आहेत.
- भूतानचे शिक्षणतज्ज्ञ फुंतशो यांचे कार्य अभिमानास्पद असल्याने निवड समितीने जाहीर केले.

**रॅमन मॅगसेसे पुरस्कार**

- आशियाचा नोबेल म्हणून ओळखला जाणारा मॅगसेसे पुरस्कार मनिला येथील "द रॅमन मॅगसेसे अवॉर्ड फाउंडेशन" तर्फे दरवर्षी देण्यात येतो.
- फिलिपाईन्सचे माजी राष्ट्राध्यक्ष रॅमन मॅगसेसे यांच्या नावाने 1957 पासून हा पुरस्कार सुरू करण्यात आला.
- सरकारी सेवा, समाजकारण, साहित्य, पत्रकारिता, शांतता आणि आंतरराष्ट्रीय संबंध आदी क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येतं.
- या पुरस्काराची सुरुवात न्यू यॉर्कमधील रॉकफेलर भावंडांनी केली.
- **रॅमन मॅगसेसे** पुरस्कार मिळवणारे पहिले भारतीय - **आचार्य विनोबा भावे**

## ऑस्करसाठी भारतातर्फे 'लापता लेडीज' या चित्रपटाची घोषणा




- किरण राव यांनी दिग्दर्शित केलेल्या लापता लेडीज या चित्रपटाची ऑस्कर 2025 साठी भारतातर्फे निवड करण्यात आली आहे.
- भारतीय चित्रपट महासंघाने चेन्नई या ठिकाणी या चित्रपटाची घोषणा केली.
- मोठ्या पडद्यावर गाजलेला ऍनिमल राष्ट्रीय पुरस्कार विजेता मल्याळम चित्रपट अट्टम आणि कान्स महोत्सवात विजेता ठरलेला ऑल वी इमॅजिन ऍज लाइट यांसह 29 चित्रपटांबाबत चर्चा करण्यात आली मात्र आमिर खान प्रोडक्शन ची निर्मिती असलेल्या लापता लेडीजने यात बाजी मारली.
- आसामी दिग्दर्शक जहाणू बरुआ यांच्या अध्यक्षतेखालील 13 सदस्यांच्या निवड समितीने एकमताने या चित्रपटाची निवड केली.

**लापता लेडीज या चित्रपटाविषयी**

- हा चित्रपट महिला सक्षमीकरणावर आधारित असून पितृसत्ताक संस्कृतीवर भाष्य करतो.
- चित्रपटाची कथा दोन नववधूंच्या अवतीभवती फिरते,ज्यांची त्यांच्या

पतीच्या घरी जाताना रेल्वे प्रवासादरम्यान अदलाबदल होते.

- या चित्रपटात कोणत्याही प्रसिद्ध कलाकारांना न घेता नवख्या कलाकाराने काम केले आहे.
- प्रतिभा रंता, स्पर्श श्रीवास्तव, नितांशी गोयल आणि रवीकिशन हे कलाकार मुख्य भूमिकेत आहेत.
- चित्रपट समीक्षकांपासून प्रेक्षकांना या सिनेमाची अनोखी गोष्ट भावली होती .
- 1 मार्च 2024 रोजी हा चित्रपट प्रदर्शित झाला होता.

## चित्रकार पराग बोरसे यांना अमेरिकेचा प्रतिष्ठित पुरस्कार



- कर्जतचे चित्रकार पराग बोरसे यांना अमेरिकेच्या पेस्टल सोसायटीने 2024 चा 'फ्लोरा बी गुफिनी मेमोरियल' पुरस्कार जाहीर झाला आहे.
- एक हजार अमेरिकन डॉलर्स आणि प्रशस्तीपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.
- 22 सप्टेंबर 2024 रोजी मॅनहॅटन, न्यूयॉर्क येथे त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.
- न्यूयॉर्कमध्ये भरणाऱ्या 'एंडूरिंग ब्रिलियंस' या नावाने प्रसिद्ध असलेल्या त्यांच्या वार्षिक आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाचे हे 52 वें वर्ष आहे.
- यावर्षी अमेरिकेच्या पेस्टल सोसायटीला जगभरातून 1155 सबमिशन प्राप्त झाली होती.
- यापैकी 125 कलाकृती प्रदर्शनासाठी निवडल्या गेल्या आहेत.
- यात पराग बोरसे यांचे सॉफ्ट पेस्टल या माध्यमातून चितारलेले 'ए टर्बन गेझ' हे एका फेटा घातलेल्या धनगराचे व्यक्ती चित्राचा समावेश आहे.
- पेस्टल सोसायटी ऑफ अमेरिका या संस्थेची फ्लोरा बी गुफिनी यांनी 1972 मध्ये स्थापना केली.
- ही अमेरिकेतील सर्वात जुनी कला संस्था आहे.
- अमेरिकन कलाजगतामधील पेस्टल माध्यमाच्या पुनर्जागरणाचे श्रेय मुख्यत्वे याच संस्थेला जाते.
- न्यूयॉर्कमधील द नॅशनल आर्ट्स क्लब मध्ये भरणारे या संस्थेचे वार्षिक प्रदर्शन हे जगभरातील कलाकारांसाठी मुख्य आकर्षण असते.
- कलावंताची तांत्रिक कुशलता आणि सृजनशीलता हा निवड प्रक्रिये मधील प्रमुख निकष असतो.

- द नॅशनल आर्ट्स क्लब, 15 ग्रामर्सी पार्क, दक्षिण न्यूयॉर्क येथे 3 सप्टेंबर ते 28 सप्टेंबर 2024 या काळात हे प्रदर्शन कला रसिकांसाठी खुले असणार आहे.
- पराग बोरसे हे एकमेव भारतीय कलाकार आहेत ज्यांच्या कलाकृतीची या संस्थेने आपल्या वार्षिक प्रदर्शनासाठी चार वेळा निवड केली आहे. तसेच अमेरिकेतून प्रकाशित होणाऱ्या पेस्टल जरनल या मॅक्झिनने सुद्धा त्यांना दोन वेळा पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे.






## भारत-फ्रान्सचा लष्करी सराव



- भारत व फ्रान्सदरम्यान 2 ते 4 सप्टेंबर दरम्यान भूमध्य समुद्रात 'एक्झरसाइज वरुण' हा संयुक्त लष्करी सराव होणार आहे.
- त्यासाठी नौदलाचे 'पी8आय' हे विमान फ्रान्समध्ये दाखल झाले.
- या सरावात दोन्ही देशांच्या नौदलांमधील सखोल समन्वय व कार्यक्षमता अधोरेखित करणाऱ्या प्रगत सामारिक डावपेचांचा समावेश असेल.

## भारतीय नौदल आणि दक्षिण आफ्रिकी नौदल यांच्यात सहकार्य वाढवण्यासाठी करार



- दक्षिण आफ्रिकी नौदलाच्या पाणबुड्यांवरील कर्मचाऱ्यांची अपघात किंवा दुर्घटनेच्या वेळी सुरक्षितता निश्चित करण्याबाबत अंमलबजावणी करारावर भारतीय नौदल आणि दक्षिण आफ्रिकी नौदल यांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत.
- त्यामुळे समुद्रात द्विपक्षीय सहकार्य वाढवण्यातील महत्त्वाचा मैलाचा टप्पा गाठला गेला आहे.
- भारतीय नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश कुमार त्रिपाठी आणि दक्षिण आफ्रिकी

नौदल प्रमुख व्हाईस ॲडमिरल मॉंडे लोबेस यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

- नौदल सुरक्षा आणि परस्पर सहयोगाप्रती वचनबद्धता या अंमलबजावणी कराराने अधोरेखित केली आहे.
- या करारांतर्गत, भारतीय नौदल आवश्यकता भासेल तेव्हा आपले खोल बुडी मारणारे बचाव वाहन वापरून सहकार्य करेल जेणेकरून दोन्ही नौदलांमधील सहकार्याला अधिक पाठबळ मिळेल.
- ही भागीदारी भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील सागरी क्षेत्रातील संबंध दृढ करणारी आहे.

## भारत-ओमान संयुक्त लष्करी सराव



- भारत-ओमान संयुक्त लष्करी सराव अल नजाहच्या पाचव्या फेरीसाठी भारतीय सैन्य दल ओमानला रवाना
- हा सराव 13 ते 26 सप्टेंबर 2024 दरम्यान सलालाह, ओमान येथील रबकूट प्रशिक्षण विभाग येथे होणार आहे.
- अल नजाह हा सराव 2015 पासून भारत आणि ओमान दरम्यान दर दोन वर्षांनी आयोजित केला जातो.
- या सरावाची यापूर्वीची सराव फेरी राजस्थानमधील महाजन येथे आयोजित करण्यात आली होती.
- 60 कर्मचाऱ्यांचा समावेश असलेल्या भारतीय लष्कराच्या तुकडीचे प्रतिनिधित्व मेकॅनाईज्ड इन्फंट्री रेजिमेंटच्या बटालियनसह इतर शस्त्रास्त्रे आणि सेवा यामधील कर्मचाऱ्यांनी केले आहे.
- ओमानच्या रॉयल आर्मीमध्येही 60 जवानांचा समावेश असून, ते फ्रंटियर फोर्सच्या तुकड्यांचे प्रतिनिधित्व करतील.

**उद्दिष्ट:**

- संयुक्त राष्ट्रांच्या चार्टरच्या VII व्या कारवाईअंतर्गत दहशतवादविरोधी कारवाया करण्यासाठी दोन्ही बाजूंची संयुक्त लष्करी क्षमता वाढवणे हे या संयुक्त सरावाचे उद्दिष्ट आहे.
- वाळवंटातील वातावरणात कशा पध्दतीने काम करावे यावर हा सराव लक्ष केंद्रित करेल.
- या सरावाच्या दरम्यान होणाऱ्या सामरिक कवायतींमध्ये जॉइंट प्लॅनिंग, कॉर्डन आणि शोधमोहीम, फाईटिंग इन बिल्ट अप एरिया, मोबाईल व्हेईकल चेक पोस्टची स्थापना, काउंटर ड्रोन आणि रूम इंटरव्हेंशन इत्यादींचा समावेश आहे.
- जगातील दहशतवादविरोधी मोहिमांचे प्रत्यक्ष अनुकरण करणारे एकत्रित क्षेत्रीय प्रशिक्षण सराव देखील यावेळी नियोजित केले गेले आहेत.

- अल नजाहच्या पाचव्या सरावात दोन्ही बाजूंनी संयुक्त कारवाई करण्यासाठी रणनीती, तंत्र आणि कार्यपद्धतींमधील सर्वोत्तम सरावांची देवाणघेवाण करण्यात येईल.
- हे दोन्ही सैन्यांमधील परस्पर कार्यक्षमता, सद्भावना आणि सौहार्द वाढवेल. याशिवाय, या संयुक्त सरावामुळे संरक्षण सहकार्य मजबूत होईल आणि दोन्ही मित्र राष्ट्रांमधील द्विपक्षीय संबंध अधिक दृढ होतील.

## क्रूझ क्षेपणास्त्राची यशस्वी उड्डाण चाचणी



- संरक्षण संशोधन आणि विकास संघटनेने (डीआरडीओ 18 एप्रिल 2024 रोजी ओडिशाच्या किनारपट्टीवरील एकात्मिक चाचणी श्रेणी (आय टी आर ), चांदीपूर इथून स्वदेशी तंत्रज्ञाननिर्मित क्रूझ क्षेपणास्त्राची (आयटीसीएम ) यशस्वी उड्डाण चाचणी केली.
- चाचणीदरम्यान, सर्व उद्दिष्टे यशस्वीरित्या साध्य करण्यात आली.
- रडार, इलेक्ट्रो ऑप्टिकल ट्रॅकिंग सिस्टीम (EOTS) आणि आयटीआर द्वारे वेगवेगळ्या ठिकाणी तैनात केलेल्या टेलीमेट्री सारख्या अनेक रेंज सेन्सर्सद्वारे क्षेपणास्त्राच्या कामगिरीचे परीक्षण करण्यात आले,ज्यामुळे उड्डाण मार्गाचा संपूर्ण माग घेता आला.
- तसेच भारतीय हवाई दलाच्या सुखोई (Su-30-Mk-I)विमानातूनही क्षेपणास्त्राच्या उड्डाणावर लक्ष ठेवण्यात आले.
- क्षेपणास्त्राने वे पॉइंट नेव्हिगेशनचा (दिशादर्शन) वापर करून इच्छित मार्गाचा अवलंब केला आणि अत्यंत कमी उंचीवरील समुद्र-स्किमिंग उड्डाणाचे प्रात्यक्षिक केले.
- या यशस्वी उड्डाण चाचणीने बेंगळुरू येथील गॅस टर्बाइन रिसर्च एस्टॅब्लिशमेंटने,विकसित केलेल्या स्वदेशी प्रणोदन प्रणालीची विश्वसनीय कामगिरीदेखील सिद्ध केली आहे.
- अधिक उत्तम आणि विश्वसनीय कामगिरी सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने हे क्षेपणास्त्र अत्याधुनिक वैमानिकी तंत्रे आणि सॉफ्टवेअर यांनी देखील सुसज्ज केले आहे.
- बेंगळूरूस्थित डीआरडीओ प्रयोगशाळेतील वैमानिकी विकास आस्थापनेने (एडीई) इतर प्रयोगशाळा तसेच भारतीय उद्योगांच्या योगदानासह हे क्षेपणास्त्र विकसित केले

## तेजस स्क्वाड्रनमध्ये प्रथमच महिला



- भारतीय हवाई दलाचे तेजस लढाऊ विमान उडविण्याचा मान प्रथमच महिलेला मिळालेला आहे.
- स्क्वाड्रन लीडर मोहना सिंह यांची तेजसच्या स्क्वाड्रन पायलट म्हणून निवड झाली आहे.
- जून 2016 मध्ये भारतीय हवाई दलात प्रथमच तीन महिलांची नियुक्ती झाली होती. त्यात मोहना यांचा समावेश होता .
- मोहना यांची तुकडी गुजरात मधील नलिया येथे असेल.




Current Affairs
Daily News
THE OFFICER
Your Personal Mentor
We have been Recognised By...
25 Sept 2024
THE OFFICER
YOUR PERSONAL MENTOR
@theofficermentor
@mpscanswerwritingpractice
9665666195 \ 9665288834
Download
Our Free
App
अधिकच्या चालू घडामोडींचा अभ्यास
करण्यासाठी Weekly Current Affairs
चे Session आवर्जून पहा.
4/4
DOWNLOAD OUR
FREE APP
WWW.THEOFFICER.in
9665666195 / 9665288834